रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३१२ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

### विदर्भातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या

**नागपूर :** राज्यातील पहिल्या टप्प्यासाठी येत्या १९ एप्रिल रोजी मतदान होणार असून विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघातील प्रचारतोफा थंडावल्या आहेत. नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, रामटेक आणि भंडारा गोंदिया या मतदारसंघांमध्ये प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून आता छुपा प्रचार सुरू झाल्याचे दिसत आहे. विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिलला पहिल्या टप्प्यासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. सर्वच उमेदवारांनी शेवटच्या दिवशी शक्तीप्रदर्शन करीत रॅली काढल्या. त्यानंतर प्रचारतोफा थंडावल्या असून आता उमेदवारांकडून भेटीगाठीवर भर दिला जाणार आहे.


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १८ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹


### तृणमूल काँग्रेसचा जाहीरनामा घोषित

**पश्चिम बंगाल :** लोकसभा निवडणूक २०२४ साठी तृणमूल काँग्रेसचा जाहीरनामा बुधवारी प्रसिद्ध झाला. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील पक्षाने दहा महत्त्वाच्या घोषणा या माध्यमातून केल्या आहेत. जाहीरनाम्यामध्ये तृणमूल काँग्रेसने एनआरसी रोखण्याचा आणि युसीसीला संपूर्ण देशामध्ये लागू होऊ न देण्याचा शब्द दिला आहे. यासोबतच जर हातात सत्ता आली तर प्रत्येक कुटुंबाला पाच किलो रेशनचं धान्य दिलं जाईल आणि बीपीएल कुटुंबांसाठी मोफत १० गॅस सिलिंडर दिले जातील, असेही टीएमसीच्या जाहीरनाम्यात जाहीर करण्यात आले आहे.

# तटकरेंना वचनांचा विसर

## संकल्पपत्रात पोकळ आश्वासनांचा पाऊस | मतदारसंघात पसरला नाराजीचा सूर

**उदय सावंत**

**। महाड ।**

रायगड लोकसभा मतदारसंघातून २०१९ च्या निवडणुकीत निवडून आलेले राष्ट्रवादीचे खासदार व विद्यमान अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष यांना दिलेल्या वचनांचा विसर पडला आहे. पुन्हा नवी आश्वासने घेऊन ते आगामी निवडणुकीत उभे राहिले आहेत. त्यामुळे मागील निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाचे काय झाले, असा सवाल रायगड लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी उपस्थित केला आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघातून २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर उभे राहिलेले व काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, पीपल्स रिपब्लिकन पार्टी, आर. पी.आय (गवई गट), स्वाभिमानी शेतकरी संघटना आघाडीकडून पाठिंबा घेऊन या निवडणुकीत विजयी झालेल्या खासदार सुनील तटकरे यांनी या लोकसभा मतदारसंघातील जनतेला जाहीरनाम्यातून दिलेल्या आश्वासनांपैकी किती आश्वासने पूर्ण केली, असा प्रश्न मागील जाहीरनाम्याचे




चित्र बघितल्यावर स्पष्ट होते.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तटकरे यांनी एक संकल्पपत्र प्रसिद्ध केले होते. या संकल्पपत्रातून देण्यात आलेली वचने किती पूर्ण झाली, हा एक प्रश्नच आहे. खासदार तटकरे यांनी मुंबईलगत असणाऱ्या रायगडमध्ये विकासाच्या अगणित संधी आहेत. मुंबईसाठीचे सेवा पुरवठा केंद्र, पर्यटनासाठीचे हब, सर्वोत्कृष्ट दर्जाची शिक्षण व आरोग्य व्यवस्था यासाठीचे केंद्र बनण्याची रायगडची क्षमता आहे. ही क्षमता विकसित करण्यासाठी आवश्यकता आहे. दूरदृष्टी धोरणांचा पाठपुरावा करण्याचा माझा तुम्हाला शब्द असल्याचे सांगितले होते. रायगड लोकसभा मतदारसंघात पुढील पाच वर्षात अमुलाग्र बदल दिसेल, असे म्हणणाऱ्या तटकरेंनी खरंच बदल केला का, याचे उत्तर तटकरेंनीच २०१९ मध्ये जाहीर केलेल्या संकल्पपत्राचे वाचन केल्यानंतर दिसून येईल, अशी चर्चा मतदारसंघात रंगली आहे.

सन २०१९ मध्ये केलेल्या जाहीर सभातून सुनील तटकरे यांनी महाडमध्ये जनतेच्या सुविधेसाठी खासदारांचे अद्ययावत पान २ वर

# जनमत सर्वेक्षण, ‘एक्झिट पोल’वर बंदीच

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

१८व्या लोकसभेसाठी मतदानाची प्रक्रिया सुरू होण्याला ४८ तासापेक्षा कमी कालावधी शिल्लक राहिलेला असताना समाजमाध्यमांमध्ये सर्रासपणे जनमत सर्वेक्षण केले जात आहे. यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन होत आहे. या उल्लंघनाच्या पार्श्वभूमीवर आज केंद्रीय निवडणूक आयोगाने जनमत सर्वेक्षण व एक्झिट पोलवर संपूर्ण बंदी असल्याचे स्पष्ट केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात अंदाज व्यक्त केले जात आहे. काही न्यूज चॅनेलनेही हे सर्वेक्षण चालविले आहे. समाज माध्यमांवर तर या हे जनमत सर्वेक्षण सुरू असून अनेक पक्षाचे नेते आपल्या सोयीचे जनमत सर्वेक्षण हे व्हॉट्सॲप, एक्स, फेसबुकच्या सहाय्याने लोकांना प्रभावित करण्यासाठी




### निवडणूक आयोगाच्या निर्देशांचं सर्रास होतंय उल्लंघन

उपयोग करून घेत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे हे उल्लंघन ठरत आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम १२६ नुसार जनमत सर्वेक्षण व मतदानोत्तर चाचणीच्या संदर्भात स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.

या निर्देशानुसार मतदानाची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी ४८ तासापूर्वीपर्यंत जनमत सर्वेक्षण करता येते. तर एक्झिट पोल हे सर्व टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया संपल्यानंतर जाहीर करता येतात. १८ व्या लोकसभेसाठी मतदानाची प्रक्रिया १९ एप्रिलपासून सुरू होत आहे. म्हणजे जनमत सर्वेक्षण हे १७ एप्रिलला बंद व्हायला पाहिजे तर एक्झिट पोलचे निकाल हे १ जूनला सायंकाळी साडेसहा वाजेनंतर जाहीर व्हायला पाहिजे. या नियमांना धाब्यावर बसवून अनेक समाजमाध्यमांमध्ये जनमत सर्वेक्षण जाहीर केले जात आहे.

बहुतेक जनमत सर्वेक्षण हे भाजपला अधिक सहाय्यभूत ठरणारे दाखविले जात आहे. हे सर्वेक्षण मुद्दाम केले जात आहेत काय, याबाबतही संभ्रम आहे. यावर केंद्रीय निवडणूक आयोगाने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही परंतु आज आयोगाने निर्देश जारी केले आहेत. यात रेडिओ, न्यूज ब्युरो, मीडिया पान २ वर






**आजचा अग्रलेख**

**‘वंचित’ला काय हवे?**

## वे|ध|क

### केजरीवालांची न्यायालयात याचिका

**नवी दिल्ली :** दिल्ली हायकोर्टात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याविषयी एक याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेमध्ये मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जेलमधून सरकार चालवण्याची परवानगी देण्याची मागणी करण्यात आली आहे. वकील श्रीकांत प्रसाद यांच्यावतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये मुख्यमंत्री केजरीवाल यांच्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे कॅबिनेट मंत्र्यांसोबत संवाद साधण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था मागण्यात आली होती. जनहित याचिकेमध्ये दिल्ली भाजपचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांना मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या राजीनाम्यावरुन चुकीच्या पद्धतीने विरोध किंवा विधानं करणं थांबवण्यासाठी याचिकेत मागणी करण्यात आली होती. सोबतच डीडीयू मार्गावर विरोध प्रदर्शनासाठी लोकांना एकत्रित करण्यात आलं; या प्रकरणात भाजप अध्यक्षांवर कारवाईची मागणी याचिकेतून करण्यात आलेली होती.

# जलजीवनच्या आडात पाणीच नाही

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

जलजीवन मिशनमुळे प्रत्येकाला मुबलक पाणी मिळणार, असा गाजावाजा रायगड जिल्हा परिषदेने केला होता. करोडो रुपये खर्च करून टाक्या, विहिरी बांधण्यात आल्या. मात्र आजही जलजीवनच्या आडात पाणीच नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अलिबाग, पनवेल, पेण व कर्जत तालुक्यातील ७० गावांतील १३ हजारहून नागरिक तहानलेले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

प्रति व्यक्ती ५५ लिटर पाणी मिळावे, यासाठी केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन योजना सुरु करण्यात आली. रायगड

> जलजीवन योजनेच्या माध्यातून ६१३ कामे पुर्ण झाली आहेत. गावोगावी जाऊन पाण्याच्या प्रश्नाबाबत माहिती घेतली जाते. जलजीवनच्या कामाचा आढावा घेतला जात आहे. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.
>
> -भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात आली. या योजनेसाठी करोडो रुपये खर्च करण्यात आले. जिल्ह्यातील अनेक गावे, वाड्यांमध्ये विहिरी, पाणी साठवण टाक्या बांधण्यात



### तेरा हजार नागरिक तहानलेले

आल्या. पाण्याची समस्या सुटण्याची आशा रायगड जिल्ह्यातील नागरिकांना होती. मात्र ही आशा महाखोटी ठरल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

जिल्ह्यामध्ये जानेवारीपासूनच पाण्याची टंचाई निर्माण झाली. पाणी कपातीकरणदेखील सुरु झाली. ही समस्या दिवसेंदिवस वाढत गेली. अलिबाग तालुक्यासह पनवेल, कर्जत, पेण, कर्जत तालुक्यातील ६० हून अधिक ठिकाणी पाण्याचा दुष्काळ निर्माण झाला आहे. तेरा हजारहून अधिक नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. पाण्यासाठी आठ-आठ दिवस वाट पहावी लागत आहे. त्यामुळे महिलांसह शाळेतील मुलांचेही हाल होत आहे. दिवसेंदिवस टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. या पाच तालुक्यात सध्या १९ टँकरमार्फत पाणी पुरवठा केला जात आहे. गावांच्या शेजारी धरणे असूनही अनेक तालुक्यातील गावांना पाणी मिळत नाही. ग्रामीण भागात गंभीर समस्या निर्माण झाली आहे. याकडे जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग नक्की करते काय असा, सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. परिणामी, प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली जात आहे.

### हुक्काप्रकरणी सहा जणांवर गुन्हा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील कोन येथील निसर्ग ढाब्याच्या पहिल्या मजल्यावर आलेल्या नागरिकांना हुक्क्यामध्ये तंबाखूयुक्त घटक असलेल्या सुगंधी पदार्थांचे सेवन करण्यासाठी दिल्याप्रकरणी सहा जणांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

निसर्ग ढाब्याच्या पहिल्या माळ्यावर हुक्का पिण्यासाठी देत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाली. त्यानुसार १७ एप्रिल रोजी निसर्ग ढाबा, कोन गाव या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकला. पहिल्या माळ्यावर हुक्का पार्लरचे मालक धैर्यशील धनंजय पान २ वर

# अहमदाबाद-वडोदरा एक्स्प्रेस वेवर अपघात

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

अहमदाबाद-वडोदरा द्रुतगती मार्गावर नडियादजवळ कारला भीषण अपघात झाला. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला असून एका व्यक्तीची प्रकृती गंभीर आहे. मागून भरधाव वेगाने येणाऱ्या कारने टँकरला धडक दिल्याने हा अपघात झाला. ही कार वडोदराहून अहमदाबादला जात होती. कारमधील सर्व १० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ८ जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोघांचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच १०८ च्या दोन रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या

**कारमधील १० जणाचा मृत्यू**



होत्या. याशिवाय एक्सप्रेस हायवे पेट्रोलिंग टीमही मदत आणि बचाव कार्यासाठी घटनास्थळी पोहोचली होती. अहमदाबाद-वडोदरा एक्स्प्रेस वेवर बुधवारी हा अपघात झाल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

# मोदी भ्रष्टाचाराचे चॅम्पियन : राहुल



**। उत्तरप्रदेश । वृत्तसंस्था ।**

इलेक्टोरल बाँड योजना ही जगातील सर्वात मोठी ‘खंडणी योजना’ आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ‘भ्रष्टाचाराचे चॅम्पियन’ आहेत, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला.

समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यासमवेत संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित करताना गांधी म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीच्या बाजूने जोरदार अंडरकरंट आहे. यावेळी भाजप फक्त १५० जागांपर्यंतच मजल मारू शकेल.आता रद्द करण्यात आलेल्या इलेक्टोरल बाँडवर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधानांचा दावा आहे की ही योजना निवडणूक निधीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणली गेली होती, मग सर्वोच्च न्यायालयाने ती का रद्द केली? इलेक्टोरल बाँड योजना ही जगातील सर्वात मोठी खंडणी योजना आहे. भारतातील उद्योगपतींना हे चांगलेच माहीत आहे. पंतप्रधानांनी कितीही स्पष्टीकरण दिले तरी त्याचा काहीही परिणाम पान २ वर

# डोंगरी पर्यटनाला चालना मिळावी

## आ. जयंत पाटील यांचे प्रतिपादन



वावे



मोरोंडे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. त्याच पध्दतीने डोंगरभागात पर्यटन वाढीला चालना मिळाली पाहिजे. जेणेकरून येथील स्थानिकांना यातून रोजगाराचे साधन मिळेल, असे प्रतिपादन शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केले.

अलिबाग तालुक्यातील मोरोंडे येथे श्रीराम मंदिरात रामनवमी उत्सव बुधवारी (दि.१७) पार पडला. यावेळी आ. जयंत पाटील बोलत होते.

यावेळी शेकाप जिल्हा आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य मधु पारधी, पंचायत समिती माजी सदस्य सुभाष वागळे, बोरघरचे माजी सरपंच मधुकर ढेबे, रामराजचे माजी सरपंच मोहन धुमाळ, अलिबाग पुरोगामी युवक संघटनेचे अध्यक्ष विक्रांत वार्डे, कुरुळ ग्रामपंचायत सदस्य अवधूत पाटील, महिला आघाडीच्या सदस्या नागेश्वरी हेमाडे, उत्तम रसाळ, धर्मा लोभी, रामचंद्र गुंड, यशवंत भगत, रमेश गुंड तसेच ग्रामस्थ, महिला मोठ्या पान २ वर

# मुरूड समुद्रात ‘लेदर जॅकेट फिश’चा ‘जॅकपॉट’



**। मुरूड । प्रतिनिधी ।**

मुरूड परिसरातील समुद्र किनारपट्टीत मासळी मिळत नसल्याने दुष्काळ पडला होता. मच्छीमार अक्षरशः मेटाकुटीला आले होते. मासळी मिळत नसल्याने मच्छीमारांना नुकसानीला सामोरे जावे लागत होते. परंतु अचानक मुरुडच्या समुद्रात मच्छीमारांना परदेशात निर्यात होणारी ‘चप्पल’ नावाची मासळी मिळू लागली आहे. गेल्या १० दिवसात १० टन मासळी मिळाल्याचे समजते आहे. नाव जरी विचित्र वाटले तरी या मासळीची किंमत आणि लोकप्रियता अधिक आहे. या मासळीचा बंपर जॅकपॉट लागल्याने मच्छीमार मालामाल झाल्याची माहिती मिळाली आहे. मासेमारीच्या

- **परदेशात मासळीला मोठी मागणी**
- **मच्छीमारांच्या उत्पन्नात चांगलीच वाढ**

प्रतिकूल परिस्थितीत देखील अशी घटना घडणे, म्हणजे ईश्वराची लीला अगाध असल्याची प्रतिक्रिया अनेक मच्छीमारांकडून ऐकायला मिळत आहे. मुरूड परिसरात या मासळीबाबत फारशी माहिती नाही. कोळी बांधवदेखील पूर्वी दुर्लक्ष करीत असत. मात्र मुंबईत याला मोठे मार्केट मिळाले आहे. पापलेट मासळी सारखीच ही अत्यंत चविष्ट मासळी असल्याचे मच्छीमारांनी सांगितले. दालदी जाळी असणाऱ्या पान २ वर

**‘चप्पल’ नावाच्या या मासळीला २५-३० वर्षांपूर्वी कोणीही ओळखत नव्हते. किंबहुना आम्ही देखील या ’सी फूड’ कडे त्या काळात दुर्लक्ष केले होते. परंतु आता या मासळीला खूपच भाव आणि महत्व प्राप्त झाले असून या मासळीला बोली भाषेत ‘गोवा पापलेट’ या नावाने देखील ओळखले जाते, अशी माहिती पेण येथील सामाजिक कार्यकर्ते विलास कोळी यांनी बोलताना दिली. शासनाने कोळी बांधवांच्या प्रलंबित समस्यांकडे गंभीरतेने पाहून समस्या सोडवायला पाहिजे, अशी मागणी कोळी यांनी केली आहे. कोकणात समुद्रकिनारी मोठ्या संख्येने कोळी लोकवस्ती असून त्यांनी शासनाकडे आपल्या योग्य मागण्या मांडल्या आहेत असे कोळी यांनी स्पष्ट केले.**

# नैनाविरोधात शेतकरी आक्रमक

## प्रकल्पाच्या विरोधात पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नैना प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी शेतीचा कोणताही मोबदला घेतलेला नाही तसेच सहमतीदेखील दिलेली नाही. त्यामुळे नैना प्रकल्पबाधित शेतकरी उत्कर्ष समिती आक्रमक झाली असून प्रकल्पाच्या विरोधात पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

पनवेल तालुक्यातील २३ गावांच्या विकास आराखड्यामध्ये स्थानिक शेतकरी आणि व्यावसायिक पूर्णपणे उध्वस्त होत आहेत. शेतकऱ्यांची ६० टक्के जमीन विना मोबदला विकासाच्या नावाने घेणार आहेत आणि चाळीस टक्के जमीन शेतकऱ्याकडे राहणार आहे. त्याला सुद्धा तीन लाख ५० हजार ते चार लाख प्रति गुंठा बेटरमेंट चार्जेस भरावयास लागणार आहेत. १७ ठिकाणच्या परवानग्या घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला गेले दहा वर्षे विरोध दर्शवला आहे. या प्रकल्पामुळे निसर्गाचा ऱ्हास होणार आहे.

तसेच या प्रकल्पामध्ये कोणताही रोजगार निर्माण होणार नाही. तरी हा प्रकल्प शेतकऱ्यांवर लादू नका, अशा प्रकारच्या दहा हजार हरकती शेतकऱ्यांनी घेतल्या आहेत. २३ गावातील ग्रामपंचायतीचे ठराव तसेच शेतकऱ्यांच्या ग्रामसभेच्या ठराव घेऊन या प्रकल्पाविरोधात उच्च न्यायालयात शेतकऱ्यांनी न्याय मिळवण्यासाठी न्यायालयीन प्रक्रियादेखील सुरू केली आहे.

शेतकऱ्यांनी व रहिवाशांनी आपल्या उदरनिर्वाहासाठी बांधलेली घरे, चाळी, इमारती अनधिकृत ठरवून त्यावर तोडक कारवाईची नोटीस देऊन शेतकरी आणि व्यावसायिक रहिवाशी यांना नैना त्रास देत आहेत. पिढ्यान्पिढ्या शेती व्यवसाय आणि शेती निगडित अनेक व्यवसाय जमिनीमध्ये करून शेतकरी उदरनिर्वाह करत आहेत. शेती गेल्यावर त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करून शासनाने २०१३ साली युडीसीपीआर अंतर्गत विकास आराखडा बनवलेला आहे.

या आराखड्याच्या अंतर्गत किंवा एमएसआरडीसी पान २ वर

निवडक

## अखंड हरिनाम सप्ताह

**रसायनी :** वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी पाताळगंगा आयोजित श्री तुकाराम गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह मोहोपाडा येथील जनता विद्यालय मैदानावर आयोजित करण्यात आला होता.या सप्ताहात रोज प्रवचन, हरिपाठ व कीर्तन ऐकण्यासाठी जिल्ह्यातील वारकरी सांप्रदायातील नागरिकांची गर्दी झाल्याचे चित्र दिसून आले. सोमवारी सायंकाळी ६ वाजता पालखी मिरवणूक होवून ७:३० वाजता दिपोत्सवाचा कार्यक्रम पार पडला.

## एकविरा देवी पालखी उत्सव

**उरण :** चैत्र नवरात्रोच्या महिन्यात एक दिवसीय उत्सव साजरा करण्यात येतो. यंदाही सालाबाद प्रमाणे एकविरा देवी सामाजिक विकास संस्था, दामोदर कोळी व मोरा ग्रामस्थ यांच्या वतीने उरण तालुक्यातील मोरा येथील श्री एकविरा देवीची पालखी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी नरेश पांचाळ यांच्या हस्ते पूजा व अभिषेक करण्यात आला. त्याच प्रमाणे भक्तांसाठी व दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

## किसन पाटील यांचे निधन

**उरण :** पनवेल तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते, नामवंत हरहुन्नरी कलाकार, उत्कृष्ट गायक किसन चंदर पाटील यांचे निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८६ होते. त्यांची अंत्यविधी वहाळ येथील स्मशानभूमीत झाले. त्यांच्या अंत्यविधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांचे दशक्रिया विधी श्री क्षेत्र लांगेश्वर मोरावे येथे तर उत्तरकार्य बुधवारी (दि.२४) त्यांच्या राहत्या घरी वहाळ येथे होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, बहिणी, मुले, मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## सभासद नोंदणी सुरु

**मुंबई :** सुनिर्मल फाऊंडेशन धारावी संस्था सात वर्षांपासून कार्यरत असून ही फाऊंडेशन धारावी व्यतिरिक्त अन्य शहरात सुद्धा आपला विस्तार करण्यासाठी सज्ज झाली आहे. त्यासाठी सुनिर्मल फाऊंडेशनने सभासद नोंदणी सुरु केली आहे. ज्या कुणा व्यक्तीला खरोखरच समाजाची सेवा निःस्वार्थ भावनेने करायची आहे त्यांनी सुनिर्मल फाऊंडेशनचे सभासद स्वीकारण्यासाठी दत्ता खंदारे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महिला संघटनेची स्थापना

**उरण :** उरण-द्रोणागिरी येथे दक्षिण भारतीय महिलानी उरणच्या दक्षिण भारतीय महिला द्रोणागिरीने नवी मुंबईतील द्रोणागिरी नोड येथे राहणाऱ्या निशा सुधीर आणि त्यांच्या गटाने महिलांच्या संघटनेची नुकतीच स्थापना केली. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी माजी नगरसेविका सुजाता गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या लेगी वर्गीस, उलवे केरळ समाजाच्या सचिव शैजा बैजु, पुष्पा कुरूप, चंद्रिका पिल्लई यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे



१८ एप्रिल
१) श्री. दिलीप महादेव रानडे
शिवलकर-नाका, कोळीवाडा,
१८-०४-१९५२
२) श्री. दत्तात्रेय धर्मा थळे
घोटवडे, पो. उसर, ता. अलिबाग
१८-०४-१९५२

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**विमल सॉ मिल, उचेडे, पेण**

**श्रीमती शालिनी विठ्ठल कुंटे, चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त, जुनी कुंटे खानावळ बाजार पेठ अलिबाग**

## मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील वडाळे तलाव परिसरात उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. प्रथमेश म्हात्रे याने आपली दुचाकी पनवेल शहर परिसरातील वडाळे तलाव परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## शतचंडी महायज्ञसह रामनवमी उत्साहात संपन्न

**पनवेल :** जागतिक शांततेसाठी सलग ३ दिवस श्री शतचंडी महायज्ञाचे आयोजन पनवेल येथील प. पू. सद्गुरु श्री साई नारायण बाबा च्या आशीर्वाद श्री साई बाबा मंदिर, पनवेल येथे करण्यात आले होते. १४ एप्रिल ते १६ एप्रिल असे सलग तीन दिवस या श्री शतचंडी महायज्ञ पार पडला या महायज्ञाम ध्ये मोठ्या प्रमाणात भाविक सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे आज रामनवमी उत्सवासाठी मोठ्या संख्येने साईभक्तांनी पहाटेपासून सहभाग घेतला होता. यात काकड आरती, अभिषेक विविध होमहवन, महाआरती व महाप्रसादाचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले होते. यासाठी पंचक्रोशीतून हजारो साईभक्त सहभागी झाले असल्याची माहिती श्री साई नारायणबाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान पनवेलचे चेअरमन खेमचंद गोपलांनी, संयोजक राम थडानी, सचिव रामलाल चौधरी यांनी दिली.

## जुगार अड्ड्यावर कारवाई

**पनवेल :** पनवेल शहरात ऑनलाइंन स्कील गेमच्या नावाखाली चालू असलेल्या जुगार अड्ड्यावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. पनवेल शहर परिसरातील वडघर खाडी पूल येथे असणाऱ्या ऑनलाईन स्किल गेम या नावाखाली आकडे लावून जुगार चालू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी बनावट ग्राहक व दोन पंच यांच्यासह सापळा रचून कारवाई केली दुकानाचे मालक व चालक यांना पोलीस ठाणे येथे आणून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाली बाह्यवळणाचा वनवास संपेना

**। पाली । वार्ताहर ।**

**पाली बाह्यवळण मार्गाला मंजुरी मिळून तब्बल १४ वर्षे उलटली आहेत. या रस्त्याच्या कामासाठी १८ कोटी; तर भूसंपादनासाठी १० कोटींची मंजुरी मिळाली आहे. मात्र, अद्यापही या रस्त्याच्या कामाला सुरुवात झालेली नाही. परिणामी पालीत वाहतूक कोंडीचा प्रश्न जटील बनला आहे. वाहनचालक व प्रवासी यांचीदेखील प्रचंड गैरसोय होताना दिसत आहे.**

वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्ग ५४८ (ए) व पाली-पाटणूस राज्यमार्ग ९४ ला जोडला जाणारा हा बाह्यवळण मार्ग म्हणजे पाली शहरातील सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीवर रामबाण उपाय आहे. असे असताना या बाह्यवळण मार्ग करण्यास राज्य सरकारला मुहूर्त कधी सापडणार? असा संतप्त सवाल नागरिकांनी केला आहे. अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात वाहतूक कोंडी दिवसेंदिवस जटील होत आहे. भाविकांना, पर्यटकांना, नागरिकांना भेडसावणाऱ्या या गंभीर समस्येकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. याशिवाय संपादित होणाऱ्या जमिनीला चांगला मोबदला मिळत नसल्यामुळे अनेक शेतकरी जमीन देण्यास तयार नसून शेतकरी संघटनेने आंदोलनदेखील केले होते.

> पाली बाह्यवळणाच्या भूसंपादनासाठी नऊ हेक्टर जागेचे अधिग्रहण करण्यात आले आहे. पाली-बलाप-बुरूमाळी व झाप येथील जागांच्या किमती अंतिम करण्यासाठी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले आहे. किमती अंतिम झाल्यानंतर पुढील प्रक्रिया करण्यात येईल.
> – संजय वायचले, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाली

बल्लाळेश्वर मंदिर, ग. बा. वडेर हायस्कूल, जुने एस. टी. स्टँड, गांधी चौक, मारुती मंदिर, बाजारपेठ, हाटाळेश्वर चौक अशा बहुतांश ठिकाणी नियमित वाहतूक कोंडी होते. असंख्य कारणांमुळे पोलिसांना या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळविणे अवघड होते. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात देवस्थानचे सुरक्षारक्षक देखील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तैनात असतात. अनेक वेळा वाहतूक कोंडीमुळे रुग्णांना तसेच रुग्णवाहिकेस रुग्णालयात पोहोचण्यास विलंब होतो. वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून बाह्यवळण मार्ग लवकर करण्यात यावा, अशी मागणी येथील नागरिकांकडून होत आहे.

### इतर वाहनांची रेलचेल

मुंबई-गोवा महामार्गाचे रुंदीकरण सुरू आहे. तेथे वारंवार वाहतूक कोंडी होते. त्यामुळे मुंबईवरून कोकणाकडे जाणारे प्रवासी पालीतून विळेमार्गे माणगाववरून किंवा वाकणवरून पुढे जातात. कोकणाकडून येणारी वाहने माणगाववरून विळेमार्गे पालीतून खोपोलीमार्गे पुणे-मुंबईकडे जातात. परिणामी पालीत वाहनांची रेलचेल वाढून अधिक वाहतूक कोंडी होते; मात्र बाह्यवळण मार्ग झाल्यास ही सर्व वाहने पालीच्या बाहेरून जाऊ शकतील आणि पालीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न संपुष्टात येईल.

### भाविक, पर्यटकांची गैरसोय

पालीत नेहमीच भाविकांची गर्दी असते. त्यातच नाताळ, माघी गणेशोत्सव, गणपती व उन्हाळी सुट्ट्यामध्ये दररोज हजारोंच्या संख्येने भाविक व त्यांची वाहने पालीत दाखल होत असतात. त्याबरोबरच पाली हे तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. परिणामी अनेक लोक कामानिमित्त व विद्यार्थी शाळा व कॉलेजमध्ये येत असतात. त्यातच पालीत अवजड वाहतूक, अवैधरीत्या पार्क केलेली वाहने व अनधिकृत बांधकामे यामुळे पालीत वारंवार वाहतूक कोंडी होते. परिणामी वाहनचालक, भाविक, पादचारी व विद्यार्थ्यांची येथून वाट काढताना मोठी गैरसोय होते. तसेच वाहतूक कोंडीमुळे अनेक अपघातदेखील झाले आहेत.

## सर्व्हेक्षण समितीची कर्जत एसटी आगाराला भेट

**। कर्जत । वार्ताहर ।**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियानांतर्गत सर्व्हेक्षण समितीने काल सायंकाळच्या सुमारास अचानक कर्जत एस टी आगाराला भेट दिली व तब्बल दोन तास सर्व परिसराची पाहणी केली तसेच कार्यालयीन कागदपत्रांची तपासणी केली. समितीने कर्जत आगाराच्या कारभाराबद्दल समाधान व्यक्त करून चांगले आगार होण्यासाठी महत्वाच्या सूचना केल्या.

दुपारी बाराच्या सुमारास ठाणे जिल्ह्याचे विभाग नियंत्रक विकास राठोड यांच्या अध्यक्षतेखालील सर्व्हेक्षण समिती कर्जत एसटी आगारामध्ये आली. विभागीय भांडार अधिकारी संजय कांबळे,




प्रवासी मित्र रुदल यादव, विजय मांडे यांचा या समितीमध्ये समावेश होता. आगार व्यवस्थापक मानसी शेळके यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर वाहतुक निरिक्षक देवानंद मोरे, सहाय्यक वाहतुक निरिक्षक महादेव पालवे, वाहतुक नियंत्रक विलास बागुल यांच्या समवेत संपूर्ण आगार परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वच्छतागृहाच्या स्वच्छतेबाबत चांगला अभिप्राय दिला. संपूर्ण आगार परिसरातील स्वच्छता, प्रवासी निवारा, कार्यालयातील कामामध्ये वेगळ्या प्रकारच्या मांडणी बद्दल समाधान व्यक्त केले.

आगार व्यवस्थापकांचे निवास स्थान, उद्घोषणा तसेच इमारतींची दुरुस्ती याबाबत सूचना केल्या. कमी मनुष्यबळ असूनही आगार चांगल्या प्रकारे चालू आहे. याबाबत समिती सदस्यांनी प्रशंसोदगार काढले. समिती अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी प्रवासी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. सूचना प्रवाशांना वाचता येतील अशा ठिकाणी व ठळकपणे असाव्यात. प्रवासी व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. अशा सूचना केल्या. त्यानंतर ते खोपोलीकडे रवाना झाले.

## सुधागड तालुका मराठा समाजाच्या वतीने
# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

सुधागड तालुका मराठा समाजाच्या वतीने विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पाली येथील डॉ. आंबेडकर स्मारकात जाऊन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भीम अनुयायांना शुभेच्छा देखील देण्यात आल्या.

सुधागड तालुका मराठा समाज संस्थेच्या ध्येयधोरणानुसार तालुक्याचा विकास, शांतता तसेच सर्व जाती धर्मात सलोख्याचे वातावरण तयार होण्यासाठी पुढाकार घेण्याचे ठरविले आहे. यानुसार भविष्यात सलोखा समिती स्थापन केली जाणार आहे.

याची सुरुवात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून करण्यात आली आहे.

या अनुषंगाने देखील मराठा समाज बांधवांनी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. असे सरचिटणीस सुजित बारसकर यांनी सांगितले.

यावेळी माजी अध्यक्ष गणपत सितापराव, सरचिटणीस सुजित बारसकर, पाली विभाग अध्यक्ष जिवन साजेकर, राबगाव विभाग अध्यक्ष अविनाश पवार, रासळ विभाग अध्यक्ष दामोदर ठाकूर, संचालक अरविंद दंत, नांदगाव विभाग अध्यक्ष सुधीर सावंत, संचालक केतन म्हस्के, संचालिका शुभदा पाटील तसेच किशोर खरीवले, अमित निंबाळकर, हभप महेश पोंगडे महाराज,अमर लहाने, अमोल मोरे, शरद गोळे, सुनील साजेकर यांच्यासह अन्य मराठा बांधव उपस्थित होते.

पान १ वरुन

## तटकरेंना वचनांचा विसर

कार्यालय असेल, असे जाहीर केले होते; मात्र दुसरी निवडणूक आली तरी खासदारांचे कार्यालय महाडमध्ये झाले नाही. खासदारांच्या भेटीसाठी नागरिकांना सुतारवाडीच्या फेऱ्या माराव्या लागल्या. अशी अनेक वचने सुनील तटकरे यांनी महाडकरांना दिली होती. महाड औद्योगिक क्षेत्रामध्ये अभियांत्रिकी उद्योग व्यवसाय आणून या औद्योगिक क्षेत्राला लागलेला रासायनिक प्रकल्पांचा डाग पुसून टाकण्याची भाषा देखील तटकरे यांनी केली होती. महाडजवळ असलेल्या वीर रेल्वे स्थानकाला महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे, अशी मागणी देखील अनेकदा सुनील तटकरे यांच्याकडे करण्यात आली होती. ही मागणी देखील केंद्राकडून पूर्णत्वास आणण्याचे प्रयत्न झाले नाहीत. महाडजवळ असलेल्या लोणेरे येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात संपूर्ण देशभरातील विद्यार्थी शिक्षण घेत असले तरी या ठिकाणी आजही अनेक पदांची गरज आहे. या ठिकाणी शेकडो एकर जमीन पडीक असल्याने अनेक वैविध्यपूर्ण कोर्स येणे आवश्यक होते; मात्र याकडेही त्यांनी कधी लक्ष दिले नसल्याचा आरोप मतदार करीत आहेत.

याशिवाय कोकणामध्ये आंबा काजू प्रक्रिया उद्योग क्लस्टर स्थापन करण्याचा आग्रह, रायगड विकास प्राधिकरणामार्फत रायगडावर जाण्यासाठी अद्यावत सुरक्षित आणि गतिमान तंत्रज्ञानाचा वापर करणारे रोपे वे, मिनी महाबळेश्वर अशी ख्याती असलेल्या दापोलीत चांगल्या प्रतीचे रस्ते, पर्यटनवृद्धीसाठी प्रयत्न, कोकणातील पर्यटन विकास हा पर्यावरणपूरक करण्याबाबत, प्रत्येक सरकारी शाळेत डिजिटल स्मार्ट क्लासरूम, लोकसेवा आयोगाच्या परीक्षा अभ्यासासाठी स्थानिक पातळीवर लोकसेवा आयोग अभ्यास केंद्र तसेच मरीन इंजीनियरिंग व नौदल अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण वर्ग, जहाज बांधणी व जहाज जोडणीचे प्रशिक्षण, किनारपट्टीजवळ वास्तव्य करणाऱ्यांच्या जीवित व मालमत्तेचे समुद्राच्या लाटांच्या माऱ्यांपासून संरक्षण करण्यासाठीचा किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्प, रोजगार निर्मिती, दळणवळणाच्या सुविधा, वॉटर स्पोर्ट, साहसी खेळांच्या सुविधा, घरगुती निवास व्यवस्थेला चालना, रोहा व दापोली येथे मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल, बहुजन समाजाच्या कुळांचे प्रश्न, जातीचे दाखले आदी समस्यांना प्राधान्य याचबरोबर प्रत्येक ग्रामपंचायतीत पर्यावरणसमृद्ध गावासाठी खासदार निधीचा बहुतांश वापर, प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचा आणि गावाचा विकास आराखडा तयार करून विकासकामे, हरित स्वच्छ व तंत्रज्ञानयुक्त रायगड, सर्व गावांची ऑप्टिकल फायबरने जोडणी, जागतिक तापमान वाढीच्या दुष्परिणामांवर नियंत्रण, तालुक्यांच्या ठिकाणी युथ होस्टेलची उभारणी अशा अनेक आश्वासनांची खैरात राष्ट्रवादीच्या अधिकृत जाहीरनाम्यावर तटकरे यांनी जनतेला दिली होती. त्यापैकी किती आश्वासनांची पूर्तता मागील पाच वर्षात तटकरे यांच्याकडून करण्यात आली, असा सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

## मोदी भ्रष्टाचाराचे चॅम्पियन : राहुल

होणार नाही कारण पंतप्रधान हे भ्रष्टाचाराचे चॅम्पियन आहेत हे संपूर्ण देशाला माहीत आहे, असे गांधी म्हणाले.

जर तुम्हाला पारदर्शकता आणायची होती, तर भाजपला हजारो कोटी रुपयांची देणगी देणाऱ्यांची नावे का लपवली गेली? ज्या कंपन्यांनी भाजपला देणग्या दिल्या त्याच्या तारखा का लपवल्या गेल्या, असा सवाल राहुल यांनी यावेळी केला. एका कंपनीला हजारो कोटींचे कंत्राट मिळाल्याचे आढळून आले आणि काही दिवसांनी त्या कंपनीने भाजपला देणगी दिली. एका फर्मची सीबीआय किंवा ईडी चौकशी झाली आणि १०-१५ दिवसांनी, त्या फर्मने भाजपला देणगी दिली आणि ती चौकशी संपली, अशा घटना समोर आल्याचा आरोप राहुल यांनी केला.

उत्तर प्रदेशातील गाझियाबादपासून गाझीपूरपर्यंत परिवर्तनाचे वारे वाहू लागतील आणि लोकसभा निवडणुकीत भाजपला भव्य निरोप दिला जाईल, असे अखिलेश यादव यावेळी म्हणाले. लोकसभा निवडणुकीत एकही मत विभागले जाणार नाही याची आम्हाला काळजी घ्यावी लागेल, असेही अखिलेश यांनी नमूद केले.

## मुरुड समुद्रात 'लेदर जॅकेट फिश'चा 'जॅकपॉट'

नौकांना सुमारे ३० ते ४० वाव म्हणजे ७० ते ८० किमी समुद्रात गेल्यावर ही मासळी मिळते. ही मासळी समुद्रातुन परस्पर विक्रीसाठी रोज मुंबईत जाते. होळीनंतर चप्पल मासळी अचानक मिळायला लागल्याची माहिती मिळताच मच्छीमारांनी त्वरित समुद्राकडे कूच केले होते, अशी माहिती रोहन निशानदार यांनी दिली. मासळीचा सिझन सध्या असाच कायम राहील, असे संकेत मच्छीमारांतून व्यक्त होत आहेत.

'चप्पल' मासळीचे नाव अनेकांना नवीन असले तरी परदेशात या मासळीला मोठा भाव मिळतो. देशात तसेच परदेशात 'लेदर जॅकेट फिश' या नावाने ओळखली जाणारी ही मासळी निर्यात होते, हे अनेकांना माहितच नाही. अत्यंत चविष्ट अशी ही मासळी असल्याची माहिती मुरूड कोळी समाजाचे ज्येष्ठ नेते तथा रायगड मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी दिली. त्यांनी सांगितले की, मुरूड समुद्रकिनारपट्टीत मत्स्यव्यवसाय विभाग, मुरूड पोलीस दल आणि तटरक्षक खात्याने काही दिवसांपूर्वी बेकायदेशीर एलईडी, पर्सनीनसारख्या बेकायदेशीर मासेमारीवर कडक कारवाई करून बंदी घातल्याने समुद्रात पारंपरिक मच्छीमारांना चप्पलसारखी महत्वाची आणि किंमती मासळी मिळू लागल्याने मच्छीमार आभार व्यक्त करीत आहेत.

१ जूननंतर दरवर्षाप्रमाणे पावसाळी मासेमारी बंद होणार असल्याने राहिलेल्या आता केवळ दीड महिन्यात मासेमारी सिझनमध्ये मच्छीमारी करता येणार आहे. त्यामुळे आता अचानक चप्पल मासळी मिळू लागल्याने या बंपर लॉटरीवर यापूर्वीच्या काळात मेटाकुटीला आलेल्या नाखवा आणि मच्छीमारांचे आर्थिक चक्र पावसाळ्यातील बंदी काळात मदतीसाठी गतिमान राहील असे दिसून येते.

एकदरा गावचे मच्छीमार नाखवा रोहन निशानदार यांनी बुधवारी सांगितले की, मुरूड आणि एकदरा येथील सुमारे ४० ते ५० मासेमारी नौकांना गेल्या १० दिवसांत सुमारे १० टन चप्पल मासळी मिळाली आहे. एका नौकेला चक्क १९०० किलो चप्पल मासळी मिळाली असून किलोचा भाव अंदाजे २८० रुपये मिळतो. हा एक मासा १ किलोचा असतो. ही मासळी पीस फ्राय करून आधिक स्वादिष्ट लागते. येथील काही दालदी जाळीच्या नौकांना प्रत्येकी ५ ते ६ लाखांची चप्पल मासळी मिळाल्याची माहिती एकदरा येथील मच्छीमार नाखवा रोहन निशानदार यांनी दिली. राजपुरी, दिघी, कुडगाव, तुरंबाडी, हरवीत, मेदडी, रहाटाड, वाशी,मजगाव बंदरकाठा आदी गावाजवळील समुद्रपट्ट्यात मात्र चप्पल मासळी मिळालेली नाही अशी माहिती राजपुरी येथील ज्येष्ठ मच्छीमार धनंजय गिदी यांनी दिली.

## जनमत सर्वेक्षण, 'एक्झिट पोल'वर बंदीच

हाऊस व टेलिव्हीजन चॅनेलला निर्देश देण्यात आले आहेत. मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी अशा सर्वेक्षणांचा वापर केला जात असल्याचे दिसून आले. या प्रकारे जनमत सर्वेक्षणांवर पूर्णपणे निर्बंध असल्याचे या निर्देशांमध्ये म्हटले आहे.

## हुक्काप्रकरणी सहा जणांवर गुन्हा

नगावडे, मॅनेजर संदेश किशोर डवळे हे त्यांचे वेटर व कामगारांच्या मदतीने धाब्यामध्ये आलेले इसमाना हुक्क्यामध्ये निकोटीन युक्त आणि तंबाखू युक्त घटक असलेल्या सुगंधी पदार्थांचे सेवन करण्यासाठी देत असल्याचे मिळून आले. त्यामुळे धैर्यशील नगावडे, संदेश डवळे मोहोपाडा, राकेश शर्मा, रमाकांत यादव, कुंजबिहारी रामलाल यादव, युवराज भाऊसाहेब शेळके (कोळखे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी या ठिकाणाहून काचेचे हुक्का पॉट, विविध डबे जप्त केले.

## डोंगरी पर्यटनाला चालना मिळावी

संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी आ. जयंत पाटील म्हणाले, गावांतील मंदिर अतिशय सुंदर बांधले आहे. अलिबाग तालुक्यातील प्रत्येक गाव सुशोभीत व सर्व सोयीसुविधांयुक्त असले पाहिजे. त्या दृष्टीकोनातून ग्रामस्थांनी काम केले पाहिजे. ग्रामस्थांनी एकोपा ठेवला पाहिजे. रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारी पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. वर्षाला दहा लाखापेक्षा अधिक पर्यटक पर्यटनस्थळी भेटी देतात. पावसाळी पर्यटनदेखील वाढू लागले आहे. डोंगर भागातील पर्यटनालादेखील महत्व वाढत आहे. त्यानुसार डोंगर भागामध्ये पर्यटन अधिक चांगले कसे होईल, याकडे ग्रामस्थांनी लक्ष दिले पाहिजे, असे आ. जयंत पाटील यांनी सांगितले.

## नैनाविरोधात शेतकरी आक्रमक

याचा समावेश किंवा पनवेल महानगरपालिका यांचा समावेश केला तर शेतकरी विचार करून विकासाला सहकार्य करतील असे नैना प्रकल्पबाधित शेतकरी उत्कर्ष समितीने मुख्यमंत्री, व्यवस्थापकीय संचालक सिडको, प्रमुख नियोजनकार, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पत्राद्वारे कळविले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल **वसीम अब्दुल सत्तार पटेल** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक **मोहम्मद खालीद इब्राहीम बानवा** यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. दामत, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६ | १/ब | ०-१२-१० पो. ख. ०-०२-३० | १-४४ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे
दि. १८/०४/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राह्मणआळी, नेरळ ता. कर्जत,
जि. रायगड मो. - ९३२५०६००३७.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्रीमती. सकीना कासीम गळाभाईवाला यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे-नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत व दुकानगाळा मिळकत**

| गावाचे नाव | सिटी सर्वे नंबर नगर भूमापन क्रमांक | सिटी सर्वे क्षेत्र चौरस मीटर | ग्रामपंचायत घर/दुकान गाळा मिळकत क्रमांक |
|---|---|---|---|
| मौजे. नेरळ ता. कर्जत, जि.रायगड | २३/१अ | ४४१.५० पैकी १०० चौरस मीटर | ३८८/ब/१ |
| | क्षेत्र १०० चौरस मीटर जमीन व त्यावरील क्षेत्र ९५९ चौरस फुट. सिमेंट पत्रा व बांधकाम केलेल्या भिंती असून व त्यामध्ये असलेले लाईट व पाणी कनेक्शन सह | | |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.
गुरुवार दिनांक १८ एप्रिल २०२४
कार्यालय पत्ता: शॉप नंबर ३.
तळ मजला, साई विला अपार्टमेंट
सम्राटनगर, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ७७१९९४४५५८/८१४९२३६७६५
सही/-
**ॲड. सुमित साहेबराव साबळे**


● (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# अवघे रामरंगी रंगले...

**संपूर्ण रायगड जिल्ह्यात रामनवमी उत्सव उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच राम मंदिरात भाविकांची रीघ पाहावयास मिळाली. जय श्री रामाच्या जयघोषाने अवघा रायगड जिल्हा भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला होता. राम मंदिर आवारात असलेल्या श्रीराम मूर्तींच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. दर्शन, मिरवणूक, फटाक्यांची आतषबाजी, महाआरती, तीर्थ प्रसाद, महाप्रसाद, महिलांचे हळदीकुंकू, फुगड्या व भजन- किर्तन आदी विविध कार्यक्रमांसह अखंड रामनामाच्या जपामुळे सर्व परिसर 'राममय' झाला होता.**

**। अलिबाग ।**
**विशेष प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यात विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याठिकाणी राम मंदिरात श्री रामजन्माचा सोहळा थाटात झाला. रामनामाचा जयघोष करून श्रीरामाला पाळण्यात घालण्यात आले. सर्वांना सुंठवडा प्रसाद वाटण्यात आला. त्यानंतर ढोलताशांच्या गजरात प्रभू रामचंद्रांची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

मुरुडमधील मिरवणुकीत राम मुर्ती असलेला सजवलेला रथ, रथात राम, लक्ष्मण, हनुमान यांची वेशभूषा केलेले कलाकार तसेच मिरवणूकीत सहभागी भक्तगणांनी भगव्या टोप्या, भगवे कुर्ते व भगव्या झेंड्यांमुळे सर्वत्र उत्साही वातावरण निर्माण झाले होते. राम, सीता तसेच लक्ष्मण जणू धर्तीवरच पुन्हा अवतरले असल्याचे यावेळी दिसून आले. ठिकठिकाणी वाजतगाजत पालखी मिरवणूक निघाली. या उत्सवानिमित्त सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते. रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्ह्यातील विविध राम मंदिरात सकाळपासून भाविकांची रेलचेल सुरू होती. धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन ठिकठिकाणी करण्यात आले होते. काही ठिकाणी रामायणाचे आयोजनदेखील मंदिरात करण्यात आले होते. मुरुडमधील एकदरा कोळी समाज व महिला मंडळ, मुंबई रहिवासी आयोजित रामनवमीनिमित्त राम जन्मकाळ गेली ६१ वर्ष मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील मोठ्या उत्साहात हा उत्सव साजरा करण्यात आला. गावकरी सर्व हेवेदावे विसरून सकाळपासून रामाच्या मंदिरात जमले होते. यावेळी ग्रामस्थांसह संपूर्ण मुरुड तालुक्यातून २ हजार भाविक जन्मकाळासाठी सहभागी झाले होते.




● (छायाचित्र : अमोल नाईक)



● रायगड जिल्ह्यात मोठ्या उत्साहात रामनवमी साजरी करण्यात आली. अलिबाग शहरासह वावे, मोरोंडे, नवखार, पोयनाड आदी तालुक्यातील विविध ठिकाणी रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. रामनवमीच्या निमित्ताने शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील, जिल्हा आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी अलिबाग तालुक्यातील वावे, मोरोंडे तसेच नवखार येथील रामजन्मोत्सवात सहभागी होत श्री रामांचे दर्शन घेतले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य मधु पारधी, माजी पंचायत समिती सदस्य सुभाष वागळे, बोरघरचे माजी सरपंच मधुकर ढेबे, रामराजचे माजी सरपंच मोहन धुमाळ, अलिबाग पुरोगामी युवक संघटनेचे अध्यक्ष विक्रात वार्डे, कुरुळ ग्रामपंचायत सदस्य अवधूत पाटील, महिला आघाडीच्या सदस्या नागेश्वरी हेमाडे, युवा कार्यकर्ते उत्तम रसाळ, सामाजिक कार्यकर्ते धर्मा लोभी, रामचंद्र गुंड, यशवंत भगत, रमेश गुंड तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी वावे, मोरोंडे तसेच नवखार येथील ग्रामस्थांनी आ. जयंत पाटील यांचे ढोल-ताशाच्या गजरात स्वागत केले. मोरोंडे येथे श्री रामजन्माचा सोहळा मोठ्या थाटात झाला. यावेळी चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीत रामनामाचा जयघोष करून श्रीरामाला पाळण्यात घालण्यात आले. सर्वांना सुंठवडा प्रसाद वाटण्यात आला. याशिवाय जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांनी खारेपाटातील राम मंदिरातील प्रभू रामांच्या मुर्तीचे दर्शन घेतले.


● (छायाचित्र : समीर मालोदे)

● अलिबागमधील श्री राम मंदिरात ब्राम्हण उत्कर्ष मंडळाच्यावतीने श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध कीर्तनकार श्री. अय्यर यांनी कीर्तनरूपाने श्रीराम जन्माची कथा सांगितली.



● खांदा वसाहतीच्या बाजूला आसुड गांव येथे नव्याने राम मंदिर उभे करण्यात आले आहे. हे मंदिर दगडावर उभे कोरण्यात आले असून रामनवमी निमित्त कीर्तन तसेच जन्मोत्सव साजरा करण्यात आला.



● नागोठण्यातील व परिसरातील सर्वच श्रीराम मंदिरात रामनवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. याबरोबरच नागोठण्यातील नवीन रामेश्वर मंदिरातही श्रीरामनवमीचा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.



● पनवेलच्या बल्लाळेश्वर मंदिरात श्री राम नवमीनिमित्त राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवात महिलांसह लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला.

## उरणमध्ये श्री राम जन्मोत्सव



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात बुधवारी (दि.१७) शहरासह ग्रामीण भागातही राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उरण, मोरा कोळीवाडा, बाजारपेठ, गणपती चौक, फुंडे, चिरनेर आदि ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. राम मंदिरांना फुलांनी सजविले होते. राम लक्ष्मण, सीता यांना आभूषणांनी सजविण्यात आले होते.

सकाळी ६ वाजता काकड आरती, ७.३० वाजता आरती, सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत सुधीर बाळ यांचे कीर्तन, दुपारी १२.४० वाजता श्री राम जन्म, १ वाजता पाळणा, १.१० वाजता आरती, सायंकाळी ४ ते ५ पर्यंत उरण भगिनी मंडळ यांचे भजन, ५ ते ६ पर्यंत गुजराती सत्संग मंडळ यांचे भजन, सायंकाळी ६ ते ७.३० पर्यंत श्री करंजा भजन मंडळ यांचे भजन, श्री गजानन प्रासादिक मंडळ यांचे भजन व सायंकाळी पालखी मिरवणूक काढण्यात आली असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात श्री राम मंदिर ट्रस्टी चंद्रकांत भाईचंद ठक्कर, कौशिक शाह, निलेश ठक्कर, सदानंद गायकवाड, विक्रम ठक्कर, कुंदप बंधू, लालू ठक्कर, मनन पटेल, दिनेश ठक्कर, कश्यप मेहता, विपुल मेहता, बंटी भाजीवाले, पालूभाई भिंडे, किरण ठक्कर, किसनलाल डांगी, कल्पेश ठक्कर, रनछोड पटेल, मनीष ठक्कर, सुरजितसिंग दसाना, मयूर मेहता आदींचे सहकार्य मिळाल्याचे, मंदिरचे ट्रस्टी चंद्रकांत भाईचंद ठक्कर यांनी सांगितले.



● वावे येथे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रीराम प्रासादिक भजन मंडळामार्फत भजन सादर करण्यात आले.



● म्हसळा हिंदू ग्रामस्थ मंडळाच्या विद्यमाने आयोजित रामनवमी उत्सवात रोहा येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार सुषमा भावे यांनी कीर्तन सादर केले. यावेळी महादेव पाटील, नंदू गोविलकर, सुशील यादव, भालचंद्र करडे, बाबू बनकर, महेंद्र करडे, गौरव पोतदार, प्रतिक गोविलकर, सुजित बोरकर, संतोष कुडेकर, संजय खांबेटे, अनिकेत पानसरे, आदि मान्यवर उपस्थित होते.

## गडब येथे कार्यक्रमांचे आयोजन



**। गडब । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील गडब येथील श्री राम ग्रामस्थ मंडळी मांचेळा व श्री राम क्रीडा मंडळ गडब-माचेळा यांचे विद्यमाने येथील श्री राम मंदिरात रामनवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. रामनवमीनिमित्त ज्ञानेश्वर महाराज हरीपाठ मंडळ यांचे हरीपाठ, इंचगिरी रसाळ सांप्रदाय नित्यपाठ भजन मंडळ वढाव, श्री सिध्दी विनायक भजन मंडळ शिगनवट, श्रीराम प्रासादिक भजन मंडळ माचेळा गडब यांचे भजनाचे कार्यक्रम तर नाद कुलाब्याचा मराठी गाणी व नृत्याचा कार्यक्रम तर रामनवमी पुष्पवृष्टीचे ज्ञानेश्वर महाराज वडखळ श्री राम जन्मोत्सवाचे किर्तन आयोजित करण्यात आले होते. यावेळी येथील महिलांनी रामजन्माचे पाळणा गीत सादर केले.

# 'वंचित'ला काय हवे?

एमआयएम हा मुस्लिमांचा पक्ष आहे. हैदराबादमध्ये त्याचा प्रभाव आहे. त्याचे नेते असदुद्दिन औवेसी हे फर्डे वक्ते आहेत. मात्र त्यांचे राजकारण हे अत्यंत संशयास्पद आहे. ते भाजप आणि मोदींवर कडवट टीका करतात. मात्र निवडणुकीत हमखास भाजपला मदत होईल अशी भूमिका घेतात. बिहारमध्ये मुस्लिम समाज अनेक वर्षांपासून लालू यादव यांच्यासोबत आहे. गेल्या निवडणुकीत त्यात फूट पाडण्यासाठी एमआयएमने उमेदवार उभे केले. पश्चिम बंगाल, महाराष्ट्र या राज्यातही हेच घडले. आता उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष व काँग्रेस एकत्र आहेत. मात्र त्यांना मुस्लिम मतांचा फायदा मिळू नये म्हणून एमआयएम तिथे दाखल झाली आहे. अशा पक्षांना हिंदीत व्होट-कटुआ असे म्हणतात. म्हणजे मते कापणारे. महाराष्ट्रात हीच भूमिका वंचित बहुजन आघाडी बजावत आहे. गेल्या वेळी वंचितची एमआयएमशी युती होती हा निव्वळ योगायोग नव्हता. यंदा अशी युती नाही. मात्र, वंचितने पुन्हा एकवार सर्वत्र उमेदवार उभे करून तीच भूमिका चालू ठेवली आहे. वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी यंदा, भाजपचा पराभव करण्यासाठी महाविकास आघाडीसोबत जाण्याची घोषणा केली होती. वंचितला आघाडीत घेतले पाहिजे व गरज पडल्यास आघाडीने दोन पावले पुढे यायला हवे अशी भूमिका आम्ही या स्तंभातून वारंवार मांडली होती. मात्र आंबेडकरांना खरोखरच एकत्र यायचे आहे का याची शंका यावी असे त्यांचे नंतरचे वर्तन होते. आघाडीच्या सर्वोच्च नेत्यांनी आपल्याशी बोलायला हवे मुद्द्यांवर ते बराच काळ अडून होते. पुढे, जागावाटपाच्या चर्चेत सामील होऊनंतरही ते जाहीरपणे आघाडीविरोधात बोलत राहिले. नेमक्या किती व कोणत्या जागा आपल्याला हव्या आहेत हे ते स्पष्ट सांगत नव्हते. मध्येच एकदा त्यांनी आपली २७ जागांवर लढण्याची तयारी झाली असल्याचे जाहीर केले. तर एकदा सर्व पक्षांनी प्रत्येकी बारा जागा लढवाव्यात असा जाहीर प्रस्ताव दिला.

### निवडणुकीनंतर गायब

गेल्या निवडणुकीच्या आधीही वंचितने हाच खेळ केला होता. त्यामुळे काँग्रेसचे नेते सावध होते. शिवसेना व वंचित यांची युती आधीच झालेली असली तरी नंतर आंबेडकर व ठाकरे यांच्यात काहीही संवाद होत नव्हता. अखेर निवडणुकीच्या तोंडावर वंचितने स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली. प्रकाश आंबेडकर एकीकडे नरेंद्र मोदी व भाजपवर टीका करतात. मोदींना यावेळी हरवले नाही तर देशातील लोकशाही धोक्यात येईल हे मान्य करतात. मात्र त्याच वेळी स्वतंत्र लढून मोदीविरोधात लढणाऱ्या महाविकास आघाडीची ताकद ते खच्चीही करतात हे समजण्याच्या पलिकडचे आहे. एक स्वतंत्र पक्ष म्हणून आपले अस्तित्व राखण्याचा व निवडणूक लढण्याचा अधिकार वंचितला नक्कीच आहे. मात्र २०२४ ची निवडणूक नेहमीसारखी नाही. खुद्द आंबेडकरांनीही ते मान्य केलेले आहे. विरोधकांतील शिवसेना व राष्ट्रवादी पक्ष भाजपवाल्यांनी सत्ता व पैशांच्या जोरावर फोडले आहेत. काँग्रेसला देशात सर्वत्र कमकुवत करण्याचा प्रयत्न केला आहे. मध्य प्रदेश व कर्नाटकात त्यांचे सरकार पाडले. त्यानंतरही जे पक्ष शिल्लक राहिले आहेत त्यांच्या मागे इडीसारख्या यंत्रणा लावून त्यांना नष्ट करण्याचा प्रयत्न चालवला आहे. अशा स्थितीत भाजपविरोधी शक्तींची एकजूट होणे अत्यंत गरजेचे आहे. वंचितने आपली शक्ती जरूर वाढवावी. मात्र ते करण्याची ही वेळ नाही. अस्तित्व टिकले तरच ताकद वाढवण्याचा विचार होऊ शकतो. दुसरे म्हणजे एक निवडणूक झाल्यानंतर दुसरी निवडणूक होईपर्यंत वंचित बहुजन आघाडी कुठे असते हेही एक कोडेच आहे. उदाहरणार्थ, २०१९ च्या निवडणुकांपासून यंदापर्यंत वंचितने महाराष्ट्रात कोणत्या प्रश्नांवर आंदोलने केली वा कोणत्या प्रश्नांवर आपल्या भूमिका मांडल्या? या काळात शेतकरी आंदोलन झाले व ते दडपण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रात शेतीमालाच्या भावांचा प्रश्न निर्माण झाला. पाणी, रस्ते, शाळा, दवाखाने यांच्याबाबत असंख्य प्रश्न आहेत. वंचितने याबाबत काहीही कृती केलेली दिसत नाही.

### भाजपची बी टीम

प्रकाश आंबेडकर अधूनमधून पत्रकार परिषदा घेतात. काही वेळेला सभा भरवतात. पण यापलिकडे वंचितचे एक पक्ष म्हणून काहीही अस्तित्व दिसत नाही. ही तर राज ठाकरे यांच्यासारखीच तऱ्हा झाली. राज हे काहीही बोलले तरी त्याला मिडियात ठळक प्रसिध्दी मिळते. तीच स्थिती प्रकाश आंबेडकरांची झाली आहे. वंचितने राज्यभर जे उमेदवार उभे केले आहेत त्यांच्यावर नजर टाकण्यासारखी आहे. यातल्या बहुतेकांचा वंचितशी पूर्वी कधीही संबंध आलेला नाही. काही जण तर काँग्रेस, राष्ट्रवादी किंवा भाजप इत्यादींमधले इच्छुक होते. तेथे उमेदवारी नाकारली म्हणून ते वंचितमध्ये आले. वंचितमध्ये त्यांच्या उमेदवारीची घोषणा करताना आवर्जून ते कोणत्या जातीचे वा समाजाचे आहे हे जाहीर केले जाते. त्यातून आपण सर्व जातींना उमेदवारी दिली आहे असे दाखवण्याचा आंबेडकरांचा प्रयत्न असतो. पण, ही मंडळी वेगवेगळ्या जातीचे आहेत म्हणून ते वंचितची प्रागतिक विचारसरणी मानतात असे गृहित धरणे धोकादायक आहे. याच तत्वानुसार शिरुरमध्ये बांदल नावाच्या उमेदवाराला तिकिट दिले गेले. हे बांदल सर्व पक्ष फिरून आलेले व गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत असे स्पष्ट झाले. त्यात कहर म्हणजे तिकिट मिळाल्यावरही ते जाहीरपणे देवेंद्र फडणवीसांच्या भेटीला गेले होते. अखेर वंचितला त्यांची उमेदवारी रद्द करावी लागली. त्यामुळे आपला सर्व खटाटोप नक्की कशासाठी आहे याचा आंबेडकरांनी एकदा विचार करावा. उलटसुलट विधाने करणे हीदेखील आंबेडकरांची खासियत आहे. परवा त्यांनी नरेंद्र मोदी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर अन्याय करीत असल्याची टीका केली. संघाच्या लोकांनी आपल्यासोबत यावे असे आवाहन त्यांनी केले. आपण नेमके कोणाविरुध्द लढत आहोत याची स्पष्टता त्यांना आहे की नाही असा प्रश्न यामुळे पडतो. गांधीजींचे पणतू तुषार गांधी यांनी वंचित ही भाजपची बी टीम असल्याची केलेली टीका केली आहे व त्यांना मते देऊ नये असे आवाहन केले आहे. ते रास्त वाटते.

विचार

# अर्थविश्व बहरतेय, बोलणे महागतेय...

**अर्थनगरीतला ताजा फेरफटका विविध क्षेत्रांमधला आर्थिक विकास अधोरेखीत करत आहे. रिअल इस्टेट क्षेत्राचा दीड लाख डॉलरचा होऊ घातलेला आकार, विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी केलेली १३ हजार कोटींची गुंतवणूक, 'इंडिगो'चे जगातील तिसरी मोठी विमान वाहतूक कंपनी बनणे लक्षवेधी असले तरी लोकसभा निवडणुकीनंतरही मोबाईलवर बोलणे महाग होणार असल्याचीही चर्चा आहे.**



**महेश देशपांडे**

अर्थनगरीतला ताजा फेरफटका विविध क्षेत्रांमधला आर्थिक विकास अधोरेखीत करत आहे. रिअल इस्टेट क्षेत्राचा दीड लाख डॉलरचा होऊ घातलेला आकार, विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी केलेली १३ हजार कोटींची गुंतवणूक, 'इंडिगो'चे जगातील तिसरी मोठी विमान वाहतूक कंपनी बनणे लक्षवेधी असले तरी लोकसभा निवडणुकीनंतरही मोबाईलवर बोलणे महाग होणार असल्याचीही चर्चा आहे.

वेगाने होत असलेल्या प्रगतीमुळे येत्या काही वर्षांमध्ये रिअल इस्टेट क्षेत्राचा आकार लक्षणीय वाढू शकतो. 'नाइट फ्रँक' आणि 'सीआयआय'च्या अलीकडील अहवालात म्हटले आहे की भारतीय रिअल इस्टेट क्षेत्राचा आकार पुढील दहा वर्षांमध्ये १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढू शकतो. 'नाईट फ्रँक इंडिया' आणि 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज' यांनी मिळून 'इंडियन रिअल इस्टेट - ए डिकेड फ्रॉम नाऊ' नावाचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात म्हटले आहे की २०३४ पर्यंत भारतीय रिअल इस्टेट क्षेत्राचा आकार १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढेल आणि एकूण आर्थिक उत्पादनात त्याचे योगदान १५ टक्के असेल. सध्या भारतीय रिअल इस्टेट क्षेत्राचा आकार सुमारे ४८२ अब्ज डॉलर आहे आणि आर्थिक उत्पादनात त्याचे योगदान ७.३ टक्के आहे. अहवालानुसार, निवासी आणि कार्यालयीन अशी दोन्ही क्षेत्रे पुढील १० वर्षांमध्ये भारतीय रिअल इस्टेटच्या वाढीस हातभार लावणार आहेत; मात्र, निवासी क्षेत्राचे योगदान कार्यालय क्षेत्रापेक्षा कितीतरी पटीने अधिक असणार आहे. भारतीय रिअल इस्टेट क्षेत्रातील निवासी क्षेत्राचे योगदान ९०६ अब्ज डॉलर्स असेल, तर कार्यालय क्षेत्रात त्याला १२५ अब्ज डॉलर्सचे योगदान देईल. नाईट फ्रँक म्हणते की शहरांमध्ये घरांची मागणी येत्या काही वर्षांमध्ये मजबूत राहणार आहे. २०२४ ते २०३४ दरम्यान शहरांमध्ये ७.८ कोटी नवीन घरांची आवश्यकता असेल. इतर विभागांबद्दल बोलायचे झाल्यास २०३४ पर्यंत उत्पादन क्रियाकलापांसाठी वापरल्या जाणाऱ्या स्थावर मालमत्तेचा महसूल २८ अब्ज डॉलर्स असेल तर गोदामांचा आकार ८.९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल. भारतीय अर्थव्यवस्थेबाबत अहवालात म्हटले आहे की परिस्थिती अनुकूल राहिल्यास पुढील दहा वर्षांमध्ये देशाच्या जीडीपीचा आकार सुमारे अडीचपट वाढू शकतो. भारताच्या जीडीपीचा आकार सध्या ३.७५ ट्रिलियन डॉलर्स इतका आहे. २०३४ पर्यंत हा आकार १०.३ ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) भारतात भरपूर पैसा ओतल्याची माहिती आकडेवारीसह समोर आली आहे. एप्रिलच्या पहिल्या बारा दिवसांमध्ये 'एफपीआय'च्या माध्यमातून १३ हजार ३४७ कोटी रुपये आले आहेत. ही गुंतवणूक भारतीय समभागांमध्ये करण्यात आली आहे. २०२४ मध्ये आतापर्यंत 'एफपीआय'च्या माध्यमातून २४ हजार २४० कोटी रुपये देशात आले आहेत. फेब्रुवारी आणि मार्चमध्ये केलेल्या खरेदीनंतर आता एप्रिलमध्येही हाच ट्रेंड दिसून येत आहे. 'एफपीआय'ने केलेल्या विक्रीमुळे शेअर बाजार घसरला होता. आकडेवारीनुसार, 'एफपीआय'ने फेब्रुवारीमध्ये अंदाजे १५३९ कोटी रुपयांची आणि मार्चमध्ये ३५ हजार ९८ कोटी रुपयांची खरेदी केली होती. जानेवारीमध्ये 'एफपीआय'ने २५ हजार ७४४ कोटी रुपयांची इक्विटी विकली होती. येथे भारत-मॉरिशस कर कराराचा परिणाम पहायला मिळेल, अशी अपेक्षा आहे. जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे मुख्य गुंतवणूक धोरणकार व्ही. के. विजयकुमार यांनी सांगितले की भारत आणि मॉरिशस यांच्यातील कर करारामुळे 'एफपीआय'ने ८,०२७ कोटी रुपयांची विक्री केली. हा करार पुढील काळात 'एफपीआय'गुंतवणुकीवर परिणाम करत राहील. मध्य पूर्वेत सुरू असलेला तणाव आणि इस्रायल आणि इराण यांच्यातील संभाव्य युद्धाचा धोका यांचाही 'एफपीआय'वर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. 'एफपीआय'साठी येणारे दिवस कठीण असू शकतात. तथापि, त्यांनी आशा व्यक्त केली की 'एफपीआय'ने पैसे काढले तरी देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदार (डीआयआय) त्याची भरपाई करू शकतात. किरकोळ विक्रेते आणि उच्च नेट वर्थ व्यक्ती (एचएनआय) देखील भारतीय बाजाराच्या वाढीबद्दल आशावादी आहेत. त्यामुळे 'एफपीआय'च्या विक्रीवर फारसा परिणाम होणार नाही.

लोकसभा निवडणुकीनंतर सर्वसामान्यांना महागाईचा झटका बसू शकतो आणि हा धक्का टेलिकॉम कंपन्या देऊ शकतात, अशी क बातमी अलिकडेच ऐकायला मिळाली. एका अहवालानुसार जिओ आणि एअरटेलसारख्या दूरसंचार कंपन्या टॅरिफ वाढवण्याचा विचार करत आहेत. देशातील लोकसभा निवडणुका संपल्यानंतर या कंपन्या मोबाइल दरात कधीही वाढ करण्याची घोषणा करू शकतात. असे झाल्यास जूनमध्ये संपणाऱ्या निवडणुकांनंतर लोकांना मोबाईल फोन वापरणे महाग होणार आहे. त्यामुळे दर जास्त वाढू शकतात. 'अँटिक स्टॉक ब्रोकिंग' या विश्लेषक संस्थेच्या हवाल्याने ही भीती व्यक्त करण्यात आली आहे. 'अँटिक स्टॉक ब्रोकिंग'चा विश्वास आहे की जियो आणि एअरटेलसारख्या मोठ्या टेलिकॉम कंपन्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर आपले प्लॅन्स महाग करू शकतात. निवडणुकीनंतर टेलिकॉम कंपन्या १५ ते १७ टक्क्यांनी दर वाढवू शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे; मात्र मोबाइल कंपन्यांनी याबाबत अद्याप अधिकृतपणे काहीही सांगितलेले नाही. अलिकडेच जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार किरकोळ महागाईचा दर मार्च महिन्यात पाच टक्क्यांच्या खाली आला आहे. देशात जूनपर्यंत निवडणुकांचा कार्यक्रम सुरु राहणार आहे. देशात लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून पुढील काही आठवडे विविध टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे. ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचे २०२४ चे निकाल जाहीर होतील. यानंतर मोबाईल सेवेचे दर वाढवले जाऊ शकतात. 'अँटिक स्टॉक ब्रोकिंग'च्या मते दर वाढवल्याने टेलिकॉम कंपन्यांना फायदा होणार आहे. त्यातल्या त्यात भारती एअरटेलला सर्वात मोठा फायदा होऊ शकतो. एअरटेलचा प्रति वापरकर्ता सरासरी महसूल (एआरपीयू) सध्या २०८ रुपये आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात तो २८६ रुपयांपर्यंत वाढू शकतो. रिपोर्टनुसार, जिओ सध्या टेलिकॉम उद्योगातील सर्वात मोठी कंपनी आहे. गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये जिओचा बाजारातील हिस्सा २१.६ टक्क्यांवरून ३९.७ टक्क्यांवर पोहोचला आहे. याच सुमारास भारताची इंडिगो एअरलाइन मार्केट कॅपच्या बाबतीत जगातील तिसरी सर्वात मोठी विमान वाहतूक कंपनी बनल्याची बातमी समोर आली आहे. कंपनीचे मार्केट कॅप १७.६ बिलियन डॉलर (सुमारे १.४७ लाख कोटी) पर्यंत पोहोचले आहे. 'साऊथवेस्ट एअरलाइन्स'ला मागे टाकत 'इंडिगो'ने हे स्थान मिळवले आहे. जागतिक विमान कंपन्यांच्या या यादीत अमेरिकास्थित डेल्टा एअरलाइन्स पहिल्या क्रमांकावर आहे. तिचे मार्केट कॅप ३०.४ अब्ज डॉलर (सुमारे २.५३ लाख कोटी रुपये) आहे. रेयनियर होल्डिंग्ज २६.५ अब्ज डॉलर(२.१६ लाख कोटी रुपये) मार्केट कॅपसह दुसऱ्या स्थानावर आहे. गेल्या वर्षी मार्चमध्ये, इंडिगो मार्केट कॅपच्या बाबतीत जागतिक एअरलाइन्सच्या यादीत चौदाव्या क्रमांकावर होती. 'इंडिगो'ने डिसेंबर २०२३ मध्ये 'युनायटेड एअरलाइन्स'ला तर या वर्षी जानेवारीमध्ये 'एअर चायना'ला आणि फेब्रुवारीमध्ये 'सिंगापूर एअरलाइन्स'ला मागे टाकले. कंपनीच्या शेअर्समध्ये सहा महिन्यांमध्ये पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. गेल्या एका वर्षात कंपनीच्या समभागांनी १०२.५५ टक्के परतावा दिला आहे. गेल्या सहा महिन्यांमध्ये ५०.२५ टक्के, एका महिन्यात १८.२५ टक्के आणि या वर्षी एक जानेवारीपासून २७.७८ टक्के वाढ झाली आहे. आज म्हणजेच १० मार्च रोजी तो ४.७३ टक्के वाढीसह ८,३०६ रुपयांवर बंद झाला. 'इंडिगो' म्हणजेच 'इंटरग्लोब एव्हिएशन'चे शेअर्स १० एप्रिल रोजी ४.७३ टक्के वाढले आणि ३,८०६ रुपयांवर बंद झाले. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयच्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात 'इंडिगो'चा वाटा ६०.२ टक्के आहे. प्रवाशांच्या संख्येच्या बाबतीत 'एअर इंडिया' दुसऱ्या स्थानावर आहे. तिचा वाटा १२.२ टक्के आहे. तथापि, टाटा समूहाअंतर्गत चालणाऱ्या विमान कंपन्यांचा एकूण वाटा २८.२ टक्के आहे.

आजकाल

# हे प्रश्न विचारण्यापूर्वी विचार करा

**सुरज सामंत**

काही प्रश्न आपण आजूबाजूला ऐकतो, त्यातले काही प्रश्न भोळे असतात काही माजयुक्त, काही घृणास्पद तर काही इतर कॅटेगरीमध्ये बसणारे असतात.

आम्ही टॅक्स भरतो आणि मजा त्यांनी करायची.

मुळात त्यांना याची कल्पना नसते की ते ज्याबद्दल बोलत आहेत त्याला इन्कम टॅक्स म्हणतात जो डायरेक्ट टॅक्स मध्ये मोडतो. बाकी इनडायरेक्ट टॅक्सेस सगळेच भरत असतात जेव्हा ते कोणतीही वस्तू किंवा सेवा घेतात तेव्हा. आता इन्कम टॅक्स तेच भरणार ज्यांना त्या प्रमाणात इन्कम आहे म्हणजे या प्रश्नामागे प्रथम, अरे बहुसंख्य जनता इतके देखील कमवत नाही... याचे दुःख असले पाहिजे.

त्यातही राग कोणाबद्दल असू शकतो? तर जे प्रचंड उत्पन्न करून देखील पळवाटा वापरून कर भारणे टाळतात. पण त्या कॅटेगरी मधली लोकं तर त्यांचे आदर्श असतात. शिवाय स्वतः देखील सी ए कडे जाऊन कर कसा वाचवता येईल याचीही पूर्ण चाचपणी केली जाते. मुळात आपल्याला करातून सुटका मिळत नाही याचा जळफळाट असतो तो. पण दुःख, चीड व्यक्त करतात कोणावर?

शेतकऱ्यांची मजा आहे, कर नाही नुसती मलाई. शेती करणाऱ्यांपैकी किती टक्के जनता सधन आहे हे त्यांना माहित नसते. फक्त मिरचीचे उत्पन्न काढून २ महिन्यात चार लाख कमावले किंवा शेतकऱ्याने जग्वार घेतली असल्या बातम्या ऐकून बनवलेले चित्र असते ते. शेतीसाठी पाणी लागते ते मिळते का, हवामानाचा अचूक अंदाज दिला जातो का, वीज लागते तिचा पुरवठा दिवसभर असतो का, वीज किंवा पाणी कपात असता कोणाला प्राधान्य दिले जाते, बियाणे पुरवठा झाला असता नकली बियाणे मिळाल्यास त्याचा परिणाम काय होतो व त्याची जबाबदारी कोण घेते, कर्ज पुरवठा कोण व कसे करतो, कर्जवसुली कशी केली जाते, नैसर्गिक आपत्ती आली तर उत्पन्नाचे काय होते, नैसर्गिक आपत्ती येण्याची वारंवारता काय आहे, इंश्युरन्स मिळतो का व किती, मालाला योग्य भाव मिळतो का असे अनेक प्रश्न असतात. तुलना करण्यासाठी. लेव्हल प्लेयिंग फिल्ड साठी. शिवाय कर्जमाफी वगैरेची तुलना कॉर्पोरेट शी करून बघावी. शेती क्षेत्राला जगभरात दिल्या जाणाऱ्या सुविधांच्या तुलनेत आपल्याकडे किती मिळतात ते ही पाहावे. हा सगळं अभ्यास करून शेतीकडे स्वतः का नाही वळत ते? ते शेतकरी टोमॅटो, भाज्या, दूध रस्त्यावर का टाकतात. दान करायचे ना? कोण बोलणार, तर 'मजा नाही' म्हणून झोमॅटो वरून मागवलेला डब्बा कचऱ्यात टाकून देणारा. दान करायचे? दान करून त्यांना विरोध दर्शवता येईल? कोणी दखल घेईल? जेव्हा श्रम, घाम यांचा योग्य मोबदला सुद्धा मिळत नाही तेव्हा दान वगैरे विचार येतात? आणि आपल्या चोचल्यांसाठी सतत करत असलेल्या नासाडीचे काय? काही पण.... काम करणारा माणूस उपाशी कसा राहू शकेल? देशातील, गरिबीची व्याख्या काय आहे माहित आहे? रोजगार न मिळणाऱ्यांची संख्या? जंगलात राहणाऱ्या आदिवासींची संख्या? सोडून दिलेल्या वृद्धांची संख्या? अपंगांची संख्या? अनाथ मुलांची संख्या? मानसिक रुग्णांची संख्या? प्रकल्प ग्रस्तांची संख्या? नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान होणाऱ्यांची संख्या? जातीच्या कारणास्तव अजूनही गुलामगिरीत अडकलेल्यांची संख्या? सोडून दिलेल्या बायकांची संख्या? भटक्या विमुक्तांची संख्या? निर्वासित, शरणार्थी यांची संख्या? उपासमारीने होणारे मृत्य किंवा बालकांचे कुपोषण त्यांना खोटे वाटतात. त्यांना वाटतं की लोकं मेहनत करत नाहीत म्हणून तसं होतं. आई बाप मेहनत करतील तर मुलं कुपोषित राहणार नाहीत आणि देशातील ३५% मुलं कुपोषित आहेत.

इतके अन्याय होतात तर त्यांनी पोलिसांकडे जायचे ना... याला मुळीच नकार नाही. पण पोलिसांचं काम तपास करणे आणि न्याय देण्याचे काम हे न्याय संस्थेचे असते हे माहित आहे का? किती खटले प्रलंबित आहेत? किती नागरिक तुरुंगात खटला चालू होण्याची वाट बघत आहेत? प्रत्येक वेळेस न्याय होतो का? आणि हे असे का? ज्यांच्यावर अन्याय होतो आहे त्यांच्याबद्दल सहानभूती तर नाहीच, उलट... झोपडपट्टी आहे समोर नुसती.

हो, या गोष्टींचं वाईट वाटू शकतं. आणि त्यामागे आर्थिक हितसंबंध असणारे, राजकारणी गुंड वगैरे सुद्धा निश्चितपणे आहेत. पण कोण राहतात तिथे? निवारा ही मूलभूत गरज की चैन? आपल्या घरात येणाऱ्या कामवाली बाईला पगार वाढवून देण्याची तयारी आहे का तिने बिल्डिंग मध्ये घर घ्यावं म्हणून? की ते कचरा साफ करणारे, गटार साफ करणारे, घरकाम करणारे, रद्दी भंगार जमा करणारे वगैरेंनी जगायचंच नाही? चीड कोणाबद्दल असली पाहिजे? आणि त्यासाठी नागरिक म्हणून आपण काय करतो? आणि सगळ्या सेवा स्वस्तात पाहिजे असतील तर त्या देणाऱ्यांचे राहणीमान तसंच असणार ना? हो आणि आपण लहानपण तिथेच काढून देखील ते विसरून बोलणाऱ्यांची संख्या देखील कमी नाही. आणि त्यांच्या आवडीच्या सरकार च्या बाबतीत अडचणीत आले, निरुत्तर झाले की... सगळेच सारखे.

लोकसंसद

### असह्य उकाड्यामुळे जीव हैराण

राजस्थान, गुजरातवरून राज्यात उष्ण वारे वाहत आहेत. भरीस भर म्हणून त्याचवेळी अरबी समुद्रावरून किनारपट्टीच्या दिशेने वाहणाऱ्या आद्रर्तायुक्त उष्ण वाऱ्यांमुळे मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मुंबईसह मुंबई महानगर प्रदेशामध्ये कमाल तापमानात सरासरी दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ झाली आणि निर्माण झालेल्या उष्णतेमुळे नागरिकांचा जीव अक्षरशः मेटाकुटीला आहे. तापमापकाचा पारा अनेक ठिकाणी चाळीशीच्या पार गेला आहे. दिवसभर उन्हाचा तडाखा आणि रात्री जाणवणाऱ्या उकाड्यामुळे सध्या जनता हैराण झाली आहे. उन्हाचा तडाखा आणि उकाड्यामुळे उष्माघाताच्या घटना घडत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे पालघर जिल्ह्यातील विक्रम गडमधील केव वेडगे पाडा या गावातील एका १६ वर्षीय मुलीचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा कहर झाला असून नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी. तसेच शक्यतो दुपारी १२ ते ४ च्या दरम्यान घराबाहेर पडू नये असे आवाहन राज्य शासनाकडून करण्यात आले आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

### अठरा एप्रिल

**१८५८:-** 'भारतरत्नफ समाजसुधारक, पहिल्या महिला विद्यापीठाचे संस्थापक महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा जन्म. समाजसेवेतून वेळ काढून काही ग्रंथकार्य त्यांच्या हातून घडले. हर्बर्ट स्पेनसरच्या पुस्तकाचा 'आत्मनीतीची मूलतत्त्वे' हा अनुवाद, तसेच 'राजनीतीची मूलतत्त्वे' या पुस्तकाचा अनुवाद व १९१५ मध्ये त्यांनी लिहिलेले 'आत्मवृत्त' प्रसिध्द झाले. **१८८६:-** कवी, कथाकार, भाषांतरकार बजाबा रामचंद्र प्रधान यांचे निधन. कवी वॉल्टर स्कॉटच्या काव्यावर आधारित 'दैवयोगी' हे त्यांनी रचलेले खंडकाव्य, इंग्रजी वळणाचे मराठीतील पहिले खंडकाव्य ठरले. रुपांतरांखेरीज, त्यांच्या स्वतंत्र दीर्घकथाही प्रसिध्द झाल्या होत्या. **१९०६:-** लघुकथालेखक, वृत्तपत्रकार, नाटककार, पटकथाकार सुंदरराव भुजंगराव मानकर यांचे निधन. 'तिची दहावी मास्तरीण' ही त्यांची पहिली एकांकिका. नुकत्याच सुरु झालेल्या मुंबई आकाशवाणी केंद्रासाठी त्यांनी आठ नभोनाट्ये लिहिली. इसाइल झंगविल यांच्या 'मुशोवशीप' या नाटकावर आधारित स्त्री-पुरुष संबंधावर त्यांनी 'काचेचे घर', 'नवे जग' हे नाटक लिहिले. याशिवाय 'न्याय', 'दारुबंदी' ही त्यांची आणखी दोन नाटके. प्रबोधनकारांच्या 'खरा ब्राण' आणि 'शं.प. जोश्यांचे 'खडाष्टक' या नाटकाची पदे मानकरांनी लिहिली. मानकरांची वृत्तपत्रीय कारकिर्दीची सुरुवात 'प्रभात'चा सहसंपादक म्हणून केली. त्यानंतर वसुंधरा, मौज, चित्रा या वृत्तपत्रांच्या संपादकीय विभागात काम केले. अत्र्यांच्या 'नवयुग' मधून चित्रपटविषयक सदराचे लेखन केले. 'नवे जग' या नावाने डायजेस्ट स्वरुपाचे विनोदी मासिक त्यांनी चालवले. याशिवाय क्रिकेटच्या सामन्यांचे समालोचन करण्याचा उपक्रम मानकरांनीच केला. **१९०९:-** लेखक, पेशाने पोलिस इन्स्पेक्टर विनायक गोपाळ जोशी यांचा जन्म. ह्यांनी 'एप्रिल फूल' ह्या बालकथासंग्रहासह, 'ओळखलेत का मला? भाग १,२ अशी पुस्तके लिहिलीत. **१९१७:-** ख्यातनाम लेखिका वसुंधरा पटवर्धन यांचा जन्म. पटवर्धन यांनी कथा, कादंबरी, नाटक, ललित अशा सर्व प्रकारचे लेखन केले. 'संसार शोभा' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९५१ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर त्या अखंड लिहितच राहिल्या. स्त्रियांच्या प्रश्नांचे, त्यांच्या सभोवतालच्या स्थितीचे आणि त्यांच्या विचार करण्याच्या पध्दतीचे त्यांनी सखोल चित्रण केले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात विविध बदलांना सामोरी जाणारी स्त्री त्यांनी सक्षमपणे रेखाटली. त्यांनी ४० हून अधिक कथासंग्रह लिहिले. 'पैठणी', 'पिंपाणी', 'चेहरा आणि शोध' हे त्यांचे कथासंग्रह विशेष लोकप्रिय ठरले. 'अंतरपाट', 'संघर्ष', 'उपासना', 'ओळख' आदी त्यांचे कथासंग्रहही उल्लेखनीय होते. त्यांच्या 'हिरकणी' या नाटकाला 'मी भटकते आहे' हा त्यांचा लघुसंग्रह आणि 'हाय!' हे अमेरिकेचे प्रवासवर्णन गाजले. **१९२३:-** पुणे विद्यापीठात ग्रंथालय सहाय्यक ते ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख अशी मजल मारणारे लेखक तसेच मराठी विश्वकोशाचे ग्रंथालयशास्त्राचे अभ्यागत संपादक डॉ. मधुसूदन परशुराम पेठे यांचा जन्म. ह्यांची 'ग्रंथपालन परिभाषा संग्रह', 'हसत खेळत संदर्भ ग्रंथांची ओळख', 'संदर्भ सहाय्य' हा ग्रंथालयशास्त्र विषयक माहिती देणाऱ्या ग्रंथासह 'ज्ञानदेव वाग्यज्ञ - दर्शन' हे ज्ञानदेवांच्या अभ्यासाचे ऐतिहासिक समालोचन, तसेच ज्ञानदेव वाङ्मय सूची आणि 'श्री दामोदर पंडित विरचित चौपद्या' अशी ग्रंथसंपदा. **१९२६:-** कादंबरी लेखक पद्माकर गणेश चितळे यांचा जन्म. ह्यांनी 'काँ. पार्वतीबाई भोर', 'स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ गोडबोले' यांच्यावर चरित्रात्मक कादंबरी लिहिली. याशिवाय 'पोर्टर', 'बँडेज', 'भोगनृत्य', 'लाट', 'स्वप्नभंग' ह्या कादंबऱ्यांसह 'रशियन साहित्याचा परिचय' हा ग्रंथ लिहिला. **१९३१:-** लेखिका बालसाहित्यिक श्रीमती मृण्मयी बारपांडे यांचा जन्म. 'निर्णय आणि इतर कथा', 'एडिसन', 'मेरी क्यूरी' ह्या पुस्तकासह 'कृष्णाचा दादा', 'चांदण्याचे दागिने', 'लाखाची गोष्ट' ही त्यांची बालनाट्य प्रसिध्द. 'खडकावरचा अंकूर' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बालजीवनावर आधारित बालनाट्य तर 'भुयारातील रहस्य', 'टेंपोतील मुलगी' ही त्यांची कथात्मक पुस्तके प्रसिध्द. **१९४४:-** शाहीर दिवाकर लक्ष्मणराव कुलकर्णी (निटूरकर) यांचा जन्म. शाहीरी काव्य लेखन व लोकशाहीर म्हणून लोकप्रिय. शाहीरांनी ५१ अध्यायाच्या माध्यमातून ५६० काव्यगीत पंक्तीतून 'श्री छत्रपती शिवराय प्रताप' हा ग्रंथ साकारलाय. याशिवाय 'अभंग शिवरायांचे', 'गीतशिवायन', 'पोवाड्यांचा संग्रह' आदी पुस्तके त्यांची प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. **१९४९:-** 'कर्मयोगी' या पत्राचे संपादक रामचंद्रशंकर राजवाडे यांचे निधन. **१९६०:-** लेखिका, कवयित्री मीरा सिरसमकर यांचा जन्म. 'स्त्री, किर्लोस्कर, किस्त्रीम' मासिकाचे उपसंपादक भुषवणाऱ्या मीरा सिरसमकर यांनी 'खूप मजा करु' हा बालकाव्यसंग्रह, 'खुलताबादचा खजिना', 'नोबेल विजेत्या स्त्रियांवर 'नोबेल ललना' इ. पुस्तके लिहिलीत. त्यांचे 'हसाल तर वाचाल' हे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. **१९६६:-** योगशास्त्र संपन्न स्वामी कुवलयानंद तथा जगन्नाथ गणेश गुणे यांचे निधन. योगासंबंधीचे आपले विचार त्यांनी विविध ग्रंथातून मांडले. **१९७२:-** भारतरत्न महामहोपाध्याय पांडुरंग वामन काणे यांचे निधन. 'महाकाव्यांत प्रतिबिंबित झालेल्या आर्यांच्या चालीरीती व नीती' तसेच 'अलंकारशास्त्राचा इतिहास' या त्यांच्या दोन इंग्रजी निबंधाना मुंबई विद्यापीठाचे सुवर्णपदक मिळाले. **१९९५:-** ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक, पंचांगकर्ते पंडित धुंडिराजशास्त्री उर्फ अण्णा लक्ष्मण दाते यांचे निधन.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**




# लोकसभेला मोठी लीड द्या

## ■ विधानसभेचं तिकीट हवं तर , भाजप वरिष्ठांच्या आमदारांना सूचना

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीत महायुतीने 'मिशन ४५ प्लस' अत्यंत गांभीर्याने घेतलं आहे. त्यासाठी भाजपचे वरिष्ठ नेते कामाला लागले असून राज्यस्तरीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनाही टार्गेट देण्यात आली आहेत. ज्यांना आमदारकीचं तिकिट हवं असेल, त्यांनी लोकसभेला आपल्या विधानसभा मतदारसंघातून मोठी लीड देणं बंधनकारक आहे, असं भाजपच्या पहिल्या फळ्यातील नेत्यांनी सांगितल्याचे बोलले जात आहे.

भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी विधानसभा आमदार आणि इच्छुक उमेदवारांना सूचना दिल्या आहेत. त्यामुळे पुन्हा आमदारकीचं स्वप्न



पाहायचं असेल, तर आतापासूनच जोमाने कामाला सुरुवात करावी लागेल. विधानसभेची उमेदवारी हवी असेल, त्यांनी लोकसभेला आपल्या विधानसभा क्षेत्रातून संबंधित उमेदवाराला मोठं मताधिक्य देणं बंधनकारक आहे.

भाजप नेत्यांनी विधानसभा आमदारांना टार्गेट दिलं आहे. त्यानुसार प्रत्येकाचं रिपोर्ट कार्डच तयार केलं जाणार आहे. त्यांच्या मताधिक्याचा उमेदवाराला कसा फायदा झाला, याचं मूल्यमापन होणार आहे. विधानसभा निवडणुकांना अजून किमान सहा महिने अवकाश आहे. परंतु लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात होण्याआधीपासूनच मोर्चेबांधणी सुरु झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

दरम्यान, महायुतीतील नऊ जागांचा तिढा अद्याप सुटलेला नाही. दक्षिण मुंबई, उत्तर मध्य मुंबई, पालघर आणि सातारा मतदारसंघात भाजप उमेदवार देणार आहे. तर एकनाथ शिंदे यांची शिवसेना छत्रपती संभाजीनगर, मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघात उमेदवार घोषित करेल. नाशिकच्या जागेवरुन शिवसेना-राष्ट्रवादी, तर ठाणे आणि सिंधुदुर्ग-रत्नागिरीवरुन शिवसेना-भाजपमध्ये रस्सीखेच सुरु आहे. मात्र या तिन्ही जागा सेनेच्या हातून निसटण्याची शक्यताच अधिक आहे.

## ओवैसींचा प्रकाश आंबेडकरांना पाठिंबा

**। अकोला । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीसोबतची जागावाटपाची बोलणी फिस्कटल्यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी स्वबळावर लोकसभा निवडणूक लढण्याची घोषणा केली होती. तसेच त्यांनी काही मतदारसंघांतील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांची नावेही जाहीर केली होती. दरम्यान, स्वबळावर लढत असलेल्या प्रकाश आंबेडकर यांना त्यांच्या जुन्या सहकाऱ्याने पाठिंबा जाहीर केला आहे. एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी अकोला येथून निवडणूक लढवत असलेल्या प्रकाश आंबेडकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे. ओवैसींनी दिलेल्या पाठिंब्यामुळे अकोल्यामध्ये प्रकाश आंबेडकर यांची ताकद निश्चितपणे वाढणार आहे.

# महाविकास आघाडीचे आज शक्तिप्रदर्शन

## ■ तीन उमेदवार अर्ज भरणार; जाहीर सभा

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रिया सुळे, शिरूरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे आणि पुण्यातील उमेदवार रवींद्र धंगेकर गुरुवारी (दि. १८) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यानिमित्ताने महाविकास आघाडीच्या वतीने शक्तिप्रदर्शन करण्यात येणार असून शरद पवार यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी सभा होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी साडेदहा वाजता हे तिघे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यानंतर रास्ता पेठ येथील हॉटेल शांताईसमोर महाविकास आघाडीची सभा होणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली. या सभेच्या निमित्ताने ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, ठाकरे



गटाचे खासदार संजय राऊत, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, आम आदमी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अजित फाटके सभेला मार्गदर्शन करणार आहेत. महाविकास आघाडी लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकणार आहे. विशेष म्हणजे बारामतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार गुरुवारीच उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

पुणे आणि शिरूर लोकसभेसाठी येत्या १३ मे रोजी तर बारामतीसाठी ७ मे ला मतदान होणार आहे. महाविकास आघाडीकडून या तिन्ही लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांकडून प्रचार सुरू झाला आहे. वैयक्तिक भेटीगाठी, नागरिकांबरोबर संवाद, पदयात्रांनी मतदारसंघातील वातावरण ढवळून निघण्यास सुरूवात झाली आहे. त्यातच आता नेत्यांच्या सभांमुळे वातावरण तापणार असून आरोप-प्रत्यारोपांच्या फेरी उडण्यास सुरुवात होणार आहे. शरद पवार, संजय राऊत या सभेच्या निमित्ताने काय बोलणार, याबाबतही महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

## एमआयएमचा उमेदवार जाहीर

**। पुणे । प्रतिनिधी ।**

ऑल इंडिया मजलिस इत्तेहादुदुल मुस्लिमिन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी अनिस सुंडके यांची उमेदवारी जाहिर केली. सुंडके हे गेल्या पंचवीस वर्षापासून पुणे येथील राजकारणात सक्रीय आहेत.



औरंगाबादचे खासदार इम्तियाज जलील यांच्या निवडणूक प्रचारासाठी ओवेसी हे आले होते. येथे जाहिर सभा पार पडली.

याप्रसंगी एम आय एम पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खासदार इम्तियाज जलील कार्याध्यक्ष अब्दुल गफार कादरी औरंगाबाद व पुणे येथील अनेक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मंचावर उपस्थित होते.खासदार ओवेसी यांनी सांगितले की, आम्ही पुण्याच्या निवडणुकीमध्ये ताकदीने उतरणार आहोत. आम्ही का निवडणूक लढू नये निवडणूक लढवली पाहिजे, अशी आमची सर्वांची मनापासून इच्छा आहे. मला खात्री आहे की, पुण्याच्या लोकसभा निवडणुकीत एमआयएम पक्षाचे उमेदवार अनिस सुंडके भरघोस मताने निवडून येतील. जय भीम, जय मीमचा नारा देत सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन पुणे लोकसभा मतदारसंघात पूर्ण ताकदीने निवडणूक लढविण्याचा निर्धार उमेदवार अनिस सुंडके व पुण्यातील पक्षाचे सर्व पदाधिकाऱ्यांनी केला.

## अप्पासाहेब जगदाळे यांचा राष्ट्रवादीत पक्षप्रवेश

**। पुणे । प्रतिनिधी ।**

रडणारे, पळणारे, घाबरणारे, त्यांच्यासोबत गेले. आपल्या बरोबर राहिलेले लढणारे सामान्य लोक आहेत अशा शब्दात आमदार रोहित पवारांनी अजित पवार आणि त्यांच्यासोबत गेलेल्या नेत्यांवर निशाणा साधला. इंदापूर येथे पक्षप्रवेश सोहळ्यात ते बोलत होते. याठिकाणी अप्पासाहेब जगदाळे यांचा राष्ट्रवादी शरद पवार गटात पक्षप्रवेश पार पडला. यावेळी रोहित पवार म्हणाले की, भाजपाने अचानक इथेनोलचा निर्णय घेतला. त्यामुळे ऊस उत्पादकांचे ३०० रुपयांचे नुकसान झाले. द्राक्ष उत्पादक अडचणीत आला. भाजपा समाजामध्ये, धर्मामध्ये तेढ निर्माण करत आहे. आज



आपल्याकडे पक्षप्रवेश होत आहेत. हा ट्रेलर आहे. पिक्चर अभी बाकी है..वस्ताद हा शेवटचा डाव राखून ठेवतो, तोच आज इथला डाव आहे असं त्यांनी म्हटलं. तसेच या भागात एमआयडीसी शरद पवारांमुळे आली. भाजपाने एकालासुद्धा नोकरी दिली नाही. आता ते युनियनच्या लोकांना धमक्या देत आहेत.

याठिकाणी जो काही निधी आला त्यातील ४० टक्के मलिदा हा मलिदा गँगच्या घरामध्ये गेला आहे. ६००० रुपयांमध्ये शेतकऱ्याचे मत भाजपाने विकत घेतलंय. म्हणजे ४ रुपये दिवसाला देतेय आणि भाजपा म्हणते, शेतकरी आम्हाला मतदान करणार असंही रोहित पवारांनी भाजपावर टीकास्त्र सोडलं. दरम्यान, भाजपाच्या एकाही खासदाराने संसदेत मराठा, धनगर आरक्षणाचा मुद्दा मांडला नाही.

धनगर, लिंगायत, मराठा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा सुप्रिया सुळे सातत्याने संसदेत मांडतायेत. दडपशाहीच्या माध्यमातून बूथ ताब्यात घेऊ असं सत्तेतले लोक म्हणतात. मात्र सुप्रियाताईंची यावेळी लीड साडे तीन लाखावरून साडे चार लाखांपर्यंत असेल असा विश्वास रोहित पवारांनी व्यक्त केला.

## राणा दाम्पत्यांनी घेतली अडसूळांची भेट

**मुंबई :** मागील अनेक वर्षांपासून एकमेकांचे राजकीय प्रतिस्पर्धी असलेले राणा दाम्पत्य व माजी खासदार आनंदराव अडसूळ यांच्या कुटुंबीयांची आज भेट घडून आली. महायुतीच्या लोकसभेच्या उमेदवार नवनीत राणा व आमदार रवी राणा यांनी बुधवारी (दि.१८) माजी खा. आनंदराव अडसूळ यांच्या नवसारीस्थित निवासस्थानी भेट दिली. मात्र, यावेळी अडसूळ हे शेगाव येथे असल्याने त्यांची भेट होऊ शकली नसल्याचे सांगण्यात आले. अडसूळांच्या समर्थकांनी अद्यापही राणा यांच्या बाजूने प्रचारात उडी न घेतल्याने त्यांची नाराजी दूर करण्यासाठी ही भेट असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

## कोल्हापुरात शाहूंचे शक्तिप्रदर्शन

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी दिलेली भक्कम एकजुटीची साक्ष आणि त्या साक्षीला प्रतिसाद देत कार्यकर्त्यांच्या मोहोळ अशा सळसळत्या, उत्साहवर्धक वातावरणात लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार श्री शाहू छत्रपती यांनी मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने महाविकास आघाडीने प्रचंड शक्तिप्रदर्शन करत एकजूट दाखवून दिली. रणरणत्या उन्हाची तमा न करता जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते दाखल झाले होते. त्यामुळे दसरा चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर अक्षरशः महाजनसागर लोटला होता. हजारोंच्या संख्येने सहभागी झालेल्या



जनतेने शाहू छत्रपतींच्या विजयाचा निर्धार पक्का केला. कोल्हापूरची अस्मिता शाहू छत्रपती, शिवशाहूंचा विचार दिल्लीला पाठवू या अशा घोषणा देत या समुदायाने संपूर्ण जिल्हा महाविकास आघाडीच्या पाठीशी असल्याची ग्वाही दिली.

श्री शाहू छत्रपती यांच्यासह महाविकास आघाडी घटक पक्षातील प्रमुख नेते काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व आ. सतेज पाटील, आ. पी. एन. पाटील, वंचित बहुजन आघाडीचे दयानंद कांबळे यांच्यासह विविध संस्था, संघटना व पक्षाचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

## वे|ध|क

### श्रीरामच आता धडा शिकवतील

**मुंबई :** संपूर्ण देशात हुकुमशाहीविरोधात एक पक्के जनमत तयार झाले आहे. ते फक्त मतदानाची वाट पाहत आहेत. वचननामा जवळपास निश्चित झाला आहे. मशाल चिन्ह नवीन असले तरी सर्वांना आता माहित झाले आहे. या मशाल चिन्हावरच अंधेरीत पहिला विजय मिळाला होता. मशाल चिन्हावरच विजयाची सुरुवात झाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मशाल चिन्ह पोहोचले आहे. मशालीच्या रुपाने हुकुमशाही राजवट भस्म होईल, असा एल्गार उद्धव ठाकरेंनी केला.

### वंचितकडून म्हात्रे यांना उमेदवारी

**पालघर :** वंचित बहुजन आघाडीकडून पालघर लोकसभा मतदारसंघासाठी विजया ढिकर म्हात्रे यांना उमेदवार म्हणून घोषित करण्यात आली आहे. विजया म्हात्रे या सध्या पालघर तालुक्यातील कुडण ग्रामपंचायतीच्या सरपंच आहेत. त्यांनी सोनपंत दांडेकर महाविद्यालयातून पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. यापूर्वी पालघर लोकसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीतर्फे भारती कामडी तर जिजाऊ संघटनेतर्फे नीलेश सांबरे यांनी कल्पेश भावर याचे नाव घोषित केले आहे.

### राजकारणातले बंटी-बबली

**अमरावती :** अमरावतीमध्ये लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांची उमेदवारी आणि आनंद अडसूळांचा तीव्र विरोध यामुळे कमालीची रंगत निर्माण झाली आहे. २०१४ मध्ये आनंद अडसुळांचा नवनीत राणांनी पराभव केला होता. तेव्हापासून या दोघा नेत्यांमध्ये कमालीचा विरोध पाहायला मिळत आहे. त्यातच यावेळी नवनीत राणा यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे अमरावतीची उमेदवारी त्यांना जाहीर करण्यात आली. त्यामुळे आनंद अडसूळांनी त्याला विरोध केला असताना राणा दाम्पत्य थेट अभिजीत अडसूळ यांच्या घरी भेटीसाठी दाखल झाले.

# कल्याणमध्ये राजकीय भूकंप ?

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजप आ. गणपत गायकवाड यांनी सुरूवातीला बंडाची भूमिका घेतली परंतु नंतर पक्षश्रेष्ठींच्या आदेशाचे पालन करत असल्याचे सांगून त्यांनी महायुतीचा प्रचार करू, असे जाहीर केले. परंतु त्यांच्या मनात वेगळेच राजकारण सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. कारण कल्याणमधून श्रीकांत शिंदे यांच्याविरोधातील ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्या प्रचाराला आ. गणपत गायकवाड यांच्या पत्नीने उपस्थिती लावल्याने राजकीय भूकंप झाला आहे. भाजप आमदार गणपत गायकवाड यांचा वैशाली दरेकर यांना छुपा पाठिंबा



असल्याची चर्चा मतदारसंघात सुरू आहे.

महायुतीचे अपेक्षित उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे तर ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर राणे यांनीही शिवसैनिकांच्या भेटीगाठी घेत प्रचाराची मशाल पेटवली आहे. यामुळे महायुती विरुद्ध महाआघाडी अशी लढत होणार हे स्पष्ट असले, तरी महायुतीचा घटक पक्ष असलेल्या भाजपचे कार्यकर्ते, नेते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात नाराजी आहे. वरवर ही नाराजी संपल्याचे सांगितले जात असले, तरी ही नाराजी संपली नसल्याचे वारंवार दिसत आहे.

## महायुतीत अजून आठ जागांवर तिढा

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाने उदयनराजे भोसले यांना साताऱ्याची उमेदवारी अखेर मंगळवारी जाहीर केली. मात्र, पूनम महाजन यांच्या उत्तर-मध्य मुंबईसह राज्यातील किमान आठ मतदारसंघाबाबत महायुतीच्या जागावाटपाचा तिढा कायम आहे. अन्य काही जागांवरील उमेदवारीवरून भाजप नेतृत्वाची डोकेदुखी कायम आहे. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड इच्छुक असलेले छत्रपती संभाजीनगर, शिंदे गटाचे हेमंत गोडसे खासदार असलेले नाशिक, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी दावा केलेला रत्नागिरी-सिंधुदुर्ग, शिंदे गट आणि भाजप यांच्यातील चढाओढ संपलेली नाही.

# सुनंदा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**। बारामती । प्रतिनिधी ।**

आगामी लोकसभा निवडणुकीत सर्वांचं लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात नवा ट्विस्ट आला आहे. याठिकाणी शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे रिंगणात आहेत. मात्र खबरदारी म्हणून आमदार रोहित पवारांच्या मातोश्री सुनंदा पवार यांचाही उमेदवारी अर्ज भरण्यात येणार आहे. सुनंदा पवार यांनी बारामती मतदारसंघातील उमेदवारी अर्ज घेतल्यानं चर्चांना उधाण आलं आहे. सुनंदा पवार या राजेंद्र पवार यांच्या पत्नी आहेत. अजित पवार यांनीही बारामतीत डमी अर्ज घेतला होता. त्यानंतर सुनंदा पवार यांच्यासाठी शरद



पवार गटाने अर्ज घेतला आहे. सुप्रिया सुळेंचा अर्ज बाद झाला तर खबरदारी म्हणून सुनंदा पवार यांचा अर्ज भरला जाणार आहे. बारामतीत दोन्ही गटाकडून डमी अर्ज घेतल्याने याठिकाणी मतदारसंघात नवा ट्विस्ट येणार की काय अशीही चर्चा स्थानिकांमध्ये आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात पहिल्यांदाच पवार कुटुंबियांमध्ये चुरस पाहायला मिळत आहे. याठिकाणी सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यात लढत होणार आहे. परंतु खबरदारी म्हणून अजित पवारांकडून डमी अर्ज आणि शरद पवार गटाकडून सुनंदा पवार यांचा पूरक उमेदवारी अर्ज घेण्यात आला आहे. बारामतीत यंदा पवारविरुद्ध पवार अशी लढत आहे. त्यात अजित पवारांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवारांसह इतर नातेवाईक अजित पवारांविरोधात एकटवल्याचं चित्र उभं राहिले आहे. अजित पवार यांनी उमेदवारी अर्ज भरला आणि दिल्लीवरून आदेश आला की, तुमचा अर्ज कायम ठेवा आणि काकींचा अर्ज मागे घ्या, तर अजितदादांना ते मनाविरुद्ध असलं तरी ऐकावं लागेल. त्यामुळे ते त्याबाबतीत काय करतात हे येणाऱ्या काळात पाहावं लागेल, असा टोला रोहित पवार यांनी लगावला.

## भाजपाबाबत जनतेच्या मनात संताप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

जनतेच्या मनामध्ये भारतीय जनता पक्षाबद्दल संताप आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने लोक वाट बघत असून, त्यांचा कल मतदानातून दिसून येईल. राज्यात महाविकास आघाडीला चांगला प्रतिसाद मिळत असून, लोकसभेला ३२ ते ३३ जागा मिळतील, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी केला आहे. सांगलीबाबत काँग्रेसच्या नेत्यांनी काय केले, हे बघितले पाहिजे. योग्य लढत व्हावी, हा माझा प्रयत्न आहे. भाजपाविरोधात ताकद एकत्र करण्याचे काम केले पाहिजे. राज्यस्तरीय बैठकांतून काय झाले, हे आता बाहेर सांगणे योग्य होणार नाही. जे लोक वावड्या उठवत



आहेत, त्यांनी आत्मचिंतन करावे, एकास एक लढत व्हावी, अशी माझी भूमिका आहे. अर्ज माघारीपर्यंत काहीही होऊ शकते, असे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. सांगलीच्या निर्णयाबद्दल बोलणे योग्य नाही. सांगलीच्या निर्णयाबद्दल बोलणे योग्य नाही. काही लोकांचे हेतू वेगळे असतात, सांगलीबाबत त्या-त्या वेळी सगळं सांगितलं आहे. कोल्हापूरबाबत स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन शाहू महाराजांना उमेदवारी दिली आहे.

## पृथ्वीराज चव्हाणांचा उदयनराजेंवर पलटवार

**। कऱ्हाड । प्रतिनिधी ।**

पाच जिल्ह्यासाठी एक कृषी विद्यापीठ मंजुर करावे अशी माझी मागणी होती. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना कित्येक वेळा मी त्या फाईलवर सही करा म्हंटले. मात्र त्यांना सही करता येत नाही की काय? त्यांनी सहीच केली नाही अशी टिका खासदार उदयनराजे भोसले यांनी माजी मुख्यमंत्री आमदार पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर केली. त्यावर आमदार चव्हाण यांनी सही करता येत नाही हे कारण असू शकते का? सही करता येत की नाही ते महाराष्ट्रातील जनतेला माहिती आहे असा पलटवार केला.

# उमेदवारीवरुन भुजबळांचा संताप

## महायुतीच्या नेत्यांनाच दिली डेडलाईन

**। नाशिक । प्रतिनिधी।**

राज्यातील महाविकास आघाडीच्या सर्वच जागांवर उमेदवारांची घोषणा झाली आहे. मात्र, महायुतीच्या अद्यापही काही जागांवरील तिढा कायम आहे. त्यामध्ये, प्राधान्याने नाशिकच्या लोकसभा मतदारसंघात गोडसे की भुजबळ अशी चर्चा लोकांमध्ये रंगली आहे. कारण, जागावाटपात साताऱ्याची जागा भाजपाने स्वत:कडे ठेऊन घेतल्याने नाशिकच्या जागेवर राष्ट्रवादी दावा करत आहे. कारण, साताऱ्याची जागा सध्या राष्ट्रवादीकडे होती. मात्र, तिथे उदयनराजेंना उमेदवारी जाहीर करण्यात आल्याने साताऱ्याचा पेच



सुटला आहे. आता, नाशिकच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नाशिकमधून शिवसेना शिंदे गटाचे खासदार हेमंत गोडसे आग्रही आहेत. त्यातच, आज हेमंत गोडसे आणि मंत्री छगन भुजबळ यांची भेट झाली. त्यावेळी, भुजबळांनी उमेदवारी जाहीर न होण्यावरुन संताप व्यक्त केल्याचं दिसून येत आहे.

दरम्यान, नाशिकच्या जागेवरुन राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गटात रस्सीखेच सुरू आहे. मात्र, या जागेवर भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनाच तोडगा काढायचा असल्याने महायुतीतील वरिष्ठ नेते नेमकं काय निर्णय घेतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जानकरांनी घेतली शरद पवारांची भेट

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

सोलापुरातील माढा लोकसभा मतदारसंघात भाजपाचे वजनदार नेते धैर्यशील मोहिते पाटील यांना आपल्या पक्षात घेऊन उमेदवारी दिल्यानंतर आता शरद पवार यांनी ही जागा जिंकण्यासाठी डावपेच सुरू केले आहेत. या मतदारसंघातील दुसरे वजनदार नेते उत्तम जानकर यांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी शरद पवार यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. याच पार्श्वभूमीवर उत्तम जानकर आणि धैर्यशील मोहिते पाटील यांनी पुण्यात शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर उत्तम जानकर यांनी अंतिम निर्णय १९ तारखेला होईल, असे म्हणत माढ्यातील सस्पेन्स कायम ठेवला आहे.

# उमेदवार शोधताना तोंडाला फेस

## भाजपकडून निकमांना लोकसभेची केस

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**लोकसभा निवडणुकीसाठी भाजपनं मुंबईतून आतापर्यंत दोन उमेदवार दिले आहेत. भाजपचे मुंबईत तीन खासदार आहेत. पैकी दोन जागांवर भाजपनं उमेदवार जाहीर केले आहेत. विशेष म्हणजे दोन्ही जागांवर भाजपनं विद्यमान खासदारांचं तिकीट कापलं आहे. त्यानंतर आता तिसऱ्या जागेवरही भाजप नवा चेहरा देण्याच्या तयारीत आहे. या जागेसाठी ज्येष्ठ सरकारी वकील उज्वल निकम यांचं नाव चर्चेत आहे.**

उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघाच्या खासदार पूनम महाजन यांचं तिकीट कापलं जाण्याची दाट शक्यता आहे. मात्र अद्याप तरी भाजपला या ठिकाणी चांगला उमेदवार मिळालेला नाही. मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांचा वांद्रे पश्चिम मतदारसंघ महाजन यांच्याच मतदारसंघात येतो. त्यांना लोकसभेसाठी विचारणा करण्यात आली. पण त्यांनी निवडणूक लढवण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे भाजपनं निकम यांच्या नावाची चाचपणी उत्तर मध्य मुंबई मतदारसंघासाठी सुरू केली आहे.

भाजपच्या केंद्रीय नेतृत्वानं उत्तर मध्य मुंबईत तीन सर्व्हे केले. त्याचे अहवाल महाजन यांच्या विरोधात आहेत. त्यामुळे इथून नवा चेहरा देण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. वरिष्ठ सरकारी वकील असलेल्या उज्वल निकम यांच्या नावाचा विचार भाजपकडून सुरू आहे. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर उभा राहिलेला खटला, कोपर्डीतील बलात्कार यांच्यासह अनेक संवेदनशील प्रकरणं निकम यांनी हाताळली आहे. सरकारी वकील म्हणून त्यांनी बाजू मांडली आहे. त्यामुळे जनमानसातील त्यांची प्रतिमा



चांगली आहे. याचा फायदा भाजपला होऊ शकतो असा युक्तिवाद भाजपमधून केला जात आहे.

आशिष शेलार यांना राज्याच्या राजकारणात राहायचं आहे. दिल्लीत जाण्याची त्यांची इच्छा नाही. त्यामुळे ते लोकसभा निवडणूक लढवण्यास उत्सुक नाहीत. त्यांनी नकार दर्शवल्यानं अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या नावाची चाचपणी भाजपकडून करण्यात आली. पण त्यांनीही निवडणूक लढवण्यास असमर्थतता दर्शवली. त्यानंतर गेल्या आठ दिवसांपासून निकम यांच्या नावाचा विचार सुरू असल्याचं समजतं. पण यावर भाजपचे नेते जाहीरपणे बोलण्यास तयार नाहीत.

## माढ्यात जानकर-मोहिते दिलजमाई

**। सातारा । प्रतिनिधी ।**

माढा लोकसभा मतदारसंघात राजकारण सतत हेलकावे खात असून, उत्तम जानकर यांनी विमानवारी करूनही भाजपच्या पाठिंब्याचा निर्णय घेतलेला नाही. त्यातच माळशिरस तालुक्यातील कट्टर विरोधक मोहिते-पाटील यांच्याशीही हातमिळवणीबाबत चर्चा सुरू झाली आहे. यामुळे भाजपची डोकेदुखी वाढली आहे. आता जानकर काय निर्णय घेणार यावरच माढ्याचा तिढा राहणार आहे. माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मोहिते-पाटील आणि उत्तम जानकर हे पारंपरिक



विरोधक. पण, आताच्या लोकसभा निवडणुकीनिमित्ताने माढ्यात राजकारण सतत बदलत चालले आहे. मोहिते - पाटील राष्ट्रवादीच्या शरद पवार गटात गेलेत. यामुळे भाजपपुढे संकटे वाढत चाललीत. त्यातच पाठीमागील वेळी खासदार रणजितसिंह यांच्यासाठी मैदानात उतरलेले उत्तम जानकर हेही वेगळ्या भूमिकेत आहेत.

## वेधक

## सावरोली शाळेतर्फे मतदान जनजागृती



**खरोशी :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा सावरोली यांच्यावतीने मतदान जनजागृती कार्यक्रम अत्यंत उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात सायकल रॅली काढून प्रभात फेरीने करण्यात आली. शाळेतील सर्व विद्यार्थी त्याचप्रमाणे शाळेचे मुख्याध्यापक बळीराम चव्हाण सहशिक्षक जगदीश मोहने, नारायण गाडे, धनाजी थिटे, दादासाहेब मुंजाळ, जानवी सुर्वे, अंकिता चोगले तसेच ग्रामस्थ सहभागी झाले.

प्रभात फेरीत मुलांनी जनजागृती करताना माझे मत माझा अधिकार त्याचप्रमाणे मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो, अशा घोषणा दिल्या. ही प्रभात फेरी शाळेपासून सुरुवात करून गावातील अंगणवाड्या, आनंदवाडी, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणाहून फिरवण्यात आली. यावेळी ठीकठिकाणी लोकांची जनजागृती करण्यासाठी त्यांना मतदानाच्या अधिकाराबद्दल माहिती देण्यात आली. विशेष करून महिला वर्गांनी या रॅलीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

## साजगाव शाळेतर्फे जनजागृती रॅली



**खरोशी :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक अनुषंगाने स्वीप कार्यक्रम अंतर्गत साजगाव ग्रामपंचायत हद्दीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीयअधिकारी अति.सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार कर्जत, खालापूर, गटशिक्षणाधिकारी खालापूर व केंद्रप्रमुख आत्करगाव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करणेत आले. सदर रॅलीमध्ये रायगड जिल्हा परिषद शाळा साजगाव ता. खालापूर शाळेच्याच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. जे. पी. परदेशी, डी. जी. पाडवी (बीट विस्ताराधिकारी),केंद्रातील सर्व शिक्षक व स्वीप पथक प्रतिनिधी राम बिरादार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेश चव्हाण मुख्याध्यापक साजगाव, पांडुरंग काळे पदवीधर शिक्षक साजगाव यांनी मेहनत घेतली.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून श्रीवर्धन मतदारसंघाचा आढावा



**श्रीवर्धन :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत ७ मे रोजी होणाऱ्या मतदाननिमित्त १९३ श्रीवर्धन मतदार संघात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आढावा घेण्याकरिता जिल्हाधिकारी रायगड किसन जावळे यांनी अंजुमन हायस्कूल म्हसळा व न्यू इंग्लिशस्कूल म्हसळा या दोन्ही केंद्रांना भेटी देऊन योग्य त्या सूचना प्रांताधिकारी महेश पाटील यांना दिल्या. निवडणूक कामाकरिता अनेक जिल्ह्यातून येणाऱ्या निवडणूक कर्मचाऱ्यांची चोख व्यवस्था व्हावी आणि कर्मचाऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. निवडणूक कामासाठी आलेल्या प्रत्येक कर्मचारी यांच्या नाश्ता,जेवण,चहा-पाणी कडक उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे कर्मचाऱ्यांना ओआरस सारख्या ऊर्जा निर्माण करणाऱ्या पावडर व प्रथमोपचार किट सोबत देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या कडून देण्यात आल्या. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य बजावत असताना निर्भयपणे आपली जबाबदारी पार पाडण्याच्या सूचनाही देण्यात याव्यात.

याप्रसंगी त्यांच्या समवेत उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी महेश पाटील, म्हसळा तहसीलदार समीर घारे, तळा तहसीलदार स्मिता पाटील, श्रीवर्धन तहसीलदार महेंद्र वाकलेकर,विभागीय पोलीस अधिकारी डॉ. विवेक मुगळीकर, निवासी नायब तहसिलदार गणेश तेलंगे, म्हसळा पो. नि. पवन चौधरी, मंडळ अधिकारी सलीम शहा आदी मान्यवर उपस्थित होते.

## निवडणुकीच्या पाशर्वभूमीवर पोलिसांचे संचलन



**नेरळ :** लोकसभा निवडणूकीच्या दृष्टीने सर्वांना निर्धास्त वाटावे यासाठी पोलिसांनी कर्जतमध्ये संचलन केले. कर्जत शहरात पोलीस परेड मैदान येथून केलेले संचलन पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून बाजारपेठ रस्त्याने महावीर पेठमार्गे जकात नाका असे मुख्य बाजारपेठ येथून कपालेश्वर मंदिर आणि तेथून पोलीस ठाणेपर्यंत काण्यात आले. कर्जत पोलीस शस्त्र सज्ज होऊन या संचलनामध्ये सहभागी झाले होते. पोलीस उपअधीक्षक डी. डी. टेले यांच्या मार्गद्शनाखाली संचलन करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड तसेच अन्य पोलीस अधिकारी, १६ पोलीस अंमलदार, माणगाव येथील राखीव आरसिपी प्लाटून यांच्यासह ३० जणांची तुकडी असलेली राज्य राखीव पोलीस दलाची एक तुकडी तसेच १६ अंमलदार आणि १५० हून अधिक पोलीस कर्मचारी या संचलनामध्ये सहभागी झाले होते.

# रायगड, मावळमधून आघाडीसाठी काँग्रेस मैदानात

राज भंडारी / साहिल रेळेकर

**। पनवेल ।**

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात लोकसभा निवडणुकीत काही ठिकाणी काँग्रेसच्या हक्काच्या जागा पदरात न पडल्यामुळे रायगड तसेच मावळ लोकसभा मतदार संघातुन काँग्रेसचे नेते मंडळी व पदाधिकारी काहीसे अंतर ठेवून होते, मात्र, आता ही नाराजी दूर करण्यासाठी वरिष्ठ पातळीवरील महाविकास आघाडीच्या नेते मंडळींना हस्तक्षेप करावा लागला. त्यामुळे काँग्रेसने महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भक्कम पाठिंबा दिला असून, प्रचार सभांमध्ये काँग्रेस पूर्ण ताकदीनिशी प्रचार करणार असल्याची माहिती काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी दिली.



आज जे-जे भाजपमध्ये गेले आहेत त्या सगळ्यांची ईडी चौकशी झाली, ते कारवाईला घाबरले आणि भाजपची वाट धरली. आणि हे सर्व घडविणाऱ्या देवेंद्र फडणवीसांना आता सांगतो, २०२४ हे इंडिया आघाडीचे सरकार येईल त्यावेळेला काँग्रेसमधून भाजपमध्ये गेलेले हे नेते देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीत लाथ घालून बाहेर पडतील, अशी टीका महेंद्र घरत यांनी यावेळी केली.

भाजपकडून सूडबुद्धीने राजकारण सुरु आहे, पक्षाकडून ईडी, सीबीआय यासारख्या दबाव यंत्रांचा वापर करून भाजपामध्ये पक्षप्रवेश करून घेतले जात आहेत. सत्ता काबीज करण्यासाठी भाजपा कोणत्याही थराला जात आहे. मलाही भाजप पक्षात येण्याची ऑफर आली होती, परंतु 'जिना यहाँ मरना यहाँ, इसके सिंवा जाना कहां' असे म्हणत शेवटपर्यंत काँग्रेसची साथ सोडणार नसल्याची स्पष्टोक्ती घरत यांनी दिली. पुढे बोलताना ते म्हणाले, रायगड व मावळ लोकसभा मतदार संघात प्रत्येक कार्यकर्ता जोमाने प्रचाराच्या कामाला लागला आहे. कारण जनतेचे सरकार येण्यासाठी राहुल गांधी यांचे हात बळकट करणे ही त्यामागील भावना आहे.

मावळचे विद्यमान खा. श्रीरंग बारणे हे संसदेत भाषणे ठोकून संसदरत्न पुरस्कार मिळवीत असले तरी ते ग्राऊंडवर ते झिरो आहेत. गेल्या १० वर्षात ते किती जणांपर्यंत पोहोचलेत हे तेही सांगू शकणार नाहीत. सिडकोच्या माध्यमातून स्थानिक प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांच्या घरावर तोडक कारवाई सुरु आहे, मी अनेकदा बारणे यांची भेट घेऊन प्रकल्पग्रस्तांचे विविध प्रश्न मांडले आहेत, मुख्यमंत्री त्यांचे असतानाही प्रकल्पग्रस्तांची घरे तोडली जाताहेत, याचा अर्थ बारणे यांना भूमिपुत्रांच्या प्रश्नांबाबत कोणतीही फिकीर नाही. जनतेचे सरकार येण्यासाठी देशाला काँग्रेसशिवाय पर्याय नाही. त्यामुळे २०२४ मध्ये राज्यात व देशात इंडिया आघाडी सरकार येईल असा ठाम विश्वासही घरत यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्ह्यात अनंत गीते यांना कुणबी समाजासह मुस्लिम व अप्लसंख्यांक समाजाचे भरघोस मतदान होईल. तटकरेंनी धर्मांमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या भाजपशी हातमिळवणी केल्याने अल्पसंख्यांक समाज मोठ्या प्रमाणावर दुखावला गेला आहे. त्यामुळे या निडणुकीत अल्पसंख्यांकांच्या मतांचा फटका हा तटकरे यांना बसल्याशिवाय राहणार नाही. या निवडणुकीत मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी या समाजाची मते ही निर्णायक ठरणार आहेत. भाजपने हिंदू-मुस्लिम असा तेढ निर्माण केल्याने मुस्लिम मतदार मोठ्या प्रमाणावर नाराज झाला आहे, त्याचबरोबर इतर समाजातील मतदारही आता सुशिक्षित झाला आहे, आणि जनतेला मोदी नावाचा तिरस्कार होऊ लागला आहे. त्यामुळे होऊ घातलेल्या या निवडणुकीत मोदी आणि भाजपवर असलेल्या नाराजीचा फटका तटकरेंना बसणार आहे.

शेलघर येथील जोमा घरत सामाजिक संस्थेच्या सभागृहात जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा ॲड. श्रद्धा ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, पनवेल तालुकाध्यक्ष नंदराज मुंगाजी, डॉ. मनीष पाटील, किरीट पाटील, अखलाख शिलोत्री, मार्तंड नाखवा, रेखा घरत, वैभव पाटील आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घाटमाथ्यावर वाघेरेची जमेची बाजू

**। पनवेल । वार्ताहर ।**

मावळ मतदारसंघामध्ये पुणे आणिरायगडजिल्ह्यातीलविधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. घाटमाथ्यावर जास्त मतदार असून ही संख्या जवळपास दीड लाखाहून अधिक आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमेदवारांना आपल्या घरच्या मैदानावर जास्त मताधिक्य मिळवावे लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर दोन्ही बाजूने जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत.



भौगोलिकदृष्ट्या हा मतदारसंघ संपूर्ण राज्यात वेगळा आहे. येथे २००९ पासून शिवसेनेचा भगवा फडकला आहे. गजानन बाबर, श्रीरंग बारणे यांनी दोनदा या मतदारसंघाचे नेतृत्व केले. घाटावरील मतदारांची संख्या सुरुवातीपासून जास्त राहिलेली आहे. विशेष करून, पिंपरी- चिंचवड महापालिका क्षेत्रात दोन विधानसभा मतदारसंघ आहेत. तेथील मतदारांची संख्या नऊ लाख ६० हजार आहे. तर मावळ विधानसभा मतदारसंघात तीन लाख ६७ हजार मतदार आहेत. म्हणजेच ही संख्या १३ लाखांहून अधिक आहे. तर घाटाखालील सर्वाधिक पनवेल विधानसभा मतदारसंघातपाचलाख६५हजारइतके मतदार आहेत. कर्जत, उरण विधानसभा मतदारसंघात अनुक्रमे ३,०४,५२३ व ३,०९,२७५ इतके मतदार आहेत. हा आकडा ११ लाख ७९ हजार इतका आहे. घाटमाथ्यावरील मतदारांची संख्या जास्त असल्याने साहजिकच दोन्ही बाजूने तेथील उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. २००९ला आजम पानसरे आणि गजानन बाबर यांच्यात लोकसभेची लढाई झाली. त्यानंतर बारणे या स्थानिक उमेदवाराला शिवसेनेकडून उमेदवारी देण्यात आली. त्यांच्या विरोधामध्ये ॲड. राहुल नार्वेकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तिकीट दिले होते. मात्र, नार्वेकरांना विजय मिळवता आला नाही. मागील निवडणुकीत पार्थ पवारांना उमेदवारी देण्यात आली. पवार घराणे हे पुणे जिल्ह्यातील आहे. घाटाखाली आत्तापर्यंत एकदाही संधी दोन्ही बाजूंनी देण्यात आली नाही. आताही उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून संजोग वाघेरे निवडणूक रिंगणात आहेत. वाघेरे हे पिंपरी- चिंचवड महापालिकेचे नगरसेवक, सभापती आणि महापौर राहिले आहेत. त्यांचे वडीलसुद्धा सरपंच आणि महापौर होते. त्यामुळे वाघेरेंची ही जमेची बाजू आहे.

## अजित पवारांचे पदाधिकारी वाघेरेंच्या भेटीला

**। पिंपरी । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत कार्यकर्त्यांमध्ये राजकीय द्वंद्व रंगले आहे. मावळ मतदारसंघात सध्या एक वेगळेच चित्र पाहायला मिळत आहेत. संजोग वाघेरे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नेते होते. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असताना वाघेरे यांनी यांनी पुणे महानगरपालिकेत अनेक महत्त्वाची पदं भुषविली होती. परंतु, आता ते ठाकरे गटाचे उमेदवार असल्याने महायुती आणि पर्यायाने अजितदादांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांचा विरोधक आहे. मात्र, वाघेरे यांची जुन्या पक्षाशी असलेली नाळ अद्याप तुटलेली नाही. निवडणुकीत वाघेरे यांना या गोष्टीचा फायदा होण्याची शक्यता आहे. वाघेरे यांनी स्वत: राष्ट्रवादी काँग्रेसमधील पदाधिकारी आणि कार्यकर्ते अजूनही आपल्या संपर्कात असल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे मावळ लोकसभेच्या लढाईत ट्विस्ट आला आहे.

अजित पवार यांनी मावळ लोकसभेतील मविआचे उमेदवार संजोग वाघेरेंना भेटू नका, अशी तंबी कार्यकर्त्यांना दिली आहे. मात्र, तरीही राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते संजोग वाघेरे यांना भेटत आहेत.

## खालापूरात शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**


लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी शासनाकडून विविध प्रयोग करून जनजागृती करतांना दिसत आहे. मतदान करून आलेल्या ग्राहकांना मतदानाच्या दिवशी बिलामध्ये १० टक्के सवलत द्यावी व तशा प्रकारचे फलक आपल्या हॉटेलमध्ये लावण्यात यावे. जेणेकरून लोकांमध्ये मतदान जनजागृती होण्यास मदत होईल, तालुक्यातील वीट भट्टी व्यावसायिकांनी आपल्या वीटभट्टी कारखान्यावर काम करत असलेल्या सर्व कामगारांना मतदानाच्या दिवशी सुट्टी देत त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करून त्यांचे मतदान करून घेतले पाहिजे. कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना सुट्टी देण्यात आली पाहिजे जेणे करून मतदानाचा टक्का वाढला पाहिजे. असे यांनी सांगितले. आगामी लोकसभा निवडणुकीत खालापूर तालुक्यात शंभर टक्के मतदारांनी मतदानाचा अधिकार बजवावा असे आवाहन तांबोळी यांनी केले आहे.

## नगरपालिका प्रशासनाकडून मतदानासाठी जनजागृती

### कार्यालयातर्फे अनेक उपक्रमांचे आयोजन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी निवडणूक कार्यालयामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाहीच्या या उत्सवात जास्तीत जास्त मतदारांनी सहभाग घ्यावा यासाठी मतदार जनजागृती करण्यात येत आहे. मतदान करून लोकशाही बळकट करण्याचे अवाहन खोपोली नगरपरिषदेच्या प्रशासनातील अधिकाऱ्यांनी केले आहे.



शिक्षण समितीच्या प्रशासन अधिकारी जयश्री धायगुडे यांनी १०० टक्के मतदान झाले पाहिजे यासाठी तयार करण्यात आलेल्या गीताचे सादरीकरण करण्यात आले होते. लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा, यासाठी शासनाचे सर्व स्तरावर प्रयत्न सुरू आहेत या पार्श्वभूमीवर मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी शंभर टक्के मतदान करण्याबाबत बालिका प्रशासन जनजागृती करीत आहे. यासाठी मोक्याच्या ठिकाणी फलक लावण्यात आल्याचे त्यांनी सांगितले आहे.

याप्रसंगी उपमुख्याधिकारी गौतम भगळे, सिद्धेश खामकर, अनिल वाणी, जयश्री धायगुडे, सुरेश तारडे, जितेंद्र गोमासे, युवराज विरणक, निशिकांत सुर्वे, प्रशांत कुलकर्णी, निलेश लोखंडे, प्रणय ठाकूर, साठेलकर आदी अधिकारी उपस्थित होते.

## दिव्यांग बांधवांमध्ये मतदान जनजागृती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दिव्यांगांचे लोकशाहीमध्ये मोठे स्थान व योगदान आहे. राज्यात दिव्यांगांच्या मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी विशेष मतदार नोंदणी व मतदान जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर किंवा वोटर हेल्पलाइन ॲपवर ऑनलाइन पद्धतीने मतदान नोंदणी करण्यात येत आहे. दिव्यांगांचा मतदारांचा टक्का वाढवा यासाठी अलिबाग तालुक्यातील मौजे हशिवरे येथे दिव्यांग बांधवांमध्ये मतदान



जनजागृती बाबत दिव्यांग बांधवांना निवडणूक मतदान प्रक्रियेमध्ये शासनाने केलेल्या सोयी सुविधा बाबत अवगत करण्यासाठी तहसीलदार अलिबाग विक्रम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे उपस्थित होत्या.

## मतदान यंत्रांचे नियोजन पूर्ण

**पनवेल :** मावळ मतदान केंद्रांसाठी ३ हजार ७६ यंत्रांची आवश्यकता आहे. राखीव मतदान यंत्रे मिळून तीन हजार ५९४ यंत्रे आहेत. तीन हजार ८१९ व्हीव्हीपॅट यंत्रे उपलब्ध आहेत. त्यांच्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय स्ट्राँगरूम तयार असून, मतदान झाल्यानंतर मतपेट्या बालेवाडी क्रीडा संकुलात सुरक्षा बंदोबस्तात ठेवल्या जाणार आहेत. मतदान केंद्र अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे १२ मे रोजी सर्व साहित्य दिले जाईल, त्यानंतर ते आपापल्या मतदान केंद्रावर जातील.

## स्थिर सर्वेक्षण पथक सज्ज



**। पाली । वार्ताहर ।**

सुधागडमध्ये निवडणूकीच्या अनुषंगाने तालुक्यातील २१ गणपती व गोंदाव फाटा या ठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथक सज्ज आहेत. तालुक्यात सर्वत्र कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणुकीत कुठलाही गैरप्रकार होऊ नये या अनुषंगाने सहाय्यक निवडणूक अधिकारी पेण १९१ मतदार संघ ३२ रायगड यांच्या अधिपत्याखाली तालुक्यात बाहेरून प्रवेश करणाऱ्या सीमेवर अवैध दारू, अवैधरित्या पैसे, अवैध शस्त्रसाठा येण्याची निवडणुकीमध्ये दाट शक्यता आहे. यामुळे निवडणुकीच्या वेळेला गोंधळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मतदान सुरळीत पार पडावे यासाठी सुधागड तालुक्यात प्रवेश करणाऱ्या सर्व सीमेवर प्रतिबंधात्मक खबरदारी घेत आहेत.

## दुबार मतदानाला रोखणे अवघड

### यंदा तीन टप्प्यात निवडणूक; पनवेलमध्ये परप्रांतीयांचा भरणा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**यंदा तीन टप्प्यांमध्ये निवडणूक असल्याने दुबार मतदानाला आळा घालण्याचे मोठे आव्हान निवडणूक आयोगासमोर असणार आहे. एकाच व्यक्तीचे दोन ते तीन ठिकाणी मतदार याद्यांमध्ये नावे असतात. त्यामुळे ते दोनही ठिकाणी मतदानाचा हक्क बजावतात. त्यामुळे अशा दुबार मतदान करणाऱ्यांना रोखण्यासाठी प्रशासनासमोर सध्या कोणतीही यंत्रणा नसल्याचे दिसून येत आहे.**

निवडणूक विभागाने तयार केलेल्या मतदार याद्यांमध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी आहेत. सर्वच याद्या सदोष असतातच असे नाही. दरम्यान, मतदार याद्यांना आधार कार्ड लिंक करण्यात न आल्याने कित्येकांची दोन-दोन ठिकाणी मतदार यादीत नावे आहेत. दरम्यान, वेगवेगळ्या निवडणूक असल्यास किंवा तारखांमध्ये बदल असल्यास त्यांना दोन वेळा मतदान करता येते. विशेषतः लोकसभा निवडणुका दोन-तीन टप्प्यात होत असल्याने मतदारसंघानिहाय तारखा वेगवेगळ्या असतात. त्यामुळे ज्यांची दुबार नावे आहेत, त्यापैकी काही मतदार दोनदा मतदान करतात. पनवेलचा विचार करायचा झाला, तर याठिकाणी मिश्र लोकवस्ती आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लोक नोकरी-व्यवसायानिमित्त स्थायिक झाले आहेत. येथे मालकीचे घर तसेच शिधापत्रिका असल्याने या ठिकाणच्या मतदार यादीमध्ये त्यांच्या नावांची नोंदणी करण्यात आली आहे. यापैकी काहीजणांचे आपल्या मूळ गावी मतदान यादीमध्ये नाव असते. काही मंडळी तर गावातील स्थानिक ग्रामीण स्वराज्य संस्थेच्या निवडणुकासुद्धा लढवतात. काहीजण सरपंच, उपसरपंच आहेत. तर काही पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या नेतृत्व करीत आहेत. अनेकांचे नातेवाईक गावात राजकारण करीत असल्याने त्याठिकाणी निवडणुका लढवण्याकरिता आपल्या हक्काचे मतदान हवे, म्हणून पनवेल, मुंबईत स्थायिक झालेल्यांची नावे त्यांचा मतदार यादीत नोंदवतात. यामुळे हजारो मतदारांची दुबार नावे आहेत. याची पडताळणी करण्यासाठी निवडणूक विभागाकडे कोणतेही परिमाण नाही. त्यामुळे अनेकांचे दुबार नावे असल्याचे फावत चालले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत एका मताला किंमत असल्याने शहरात गेलेल्यांची नावे गावातील मतदार यादीमध्ये असते. पनवेल परिसरात पश्चिम महाराष्ट्रातील अनेकांचे मतदान गावी आहे. त्याचबरोबर येथील मतदार याद्यांमध्ये ही नावे आहेत. अनेक उमेदवारांनी कामोठे, कळंबोली आणि खांदा वसाहतीत स्नेहमेळावा घेऊन चला गावाकडे अशी हाक दिली आहे. तर काही जण या संदर्भात पनवेल परिसरात मेळावे घेणार आहेत.

### सात दिवसांच्या फरकाने निवडणूक

येत्या ७ मे रोजी रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी- सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले या मतदारसंघात मतदान आहे. पनवेल परिसरात या मतदारसंघातील अनेक मतदार वास्तव्यास आहेत. त्यापैकी काही जणांची दुबार नावे दोन्ही ठिकाणी आहेत. तर मावळमध्ये १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण होणार आहे. दोन्ही ठिकाणच्या मतदानाच्या तारखांमध्ये आठ दिवसांचा फरक आहे. त्यामुळे कित्येक दुबार मतदारांना दोन्ही ठिकाणी मतदान करता येणार आहे.

# पोलादपूरात सा.बां.विभागाचा भ्रष्ट कारभार

## उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रवक्ते धनंजय देशमुख यांचा आरोप

### गेली अनेक वर्ष सोयीनुसार उपअभियंता पद रिक्त ठेवले

**येथील शाखा अभियंता अमृत पाटील हे जेव्हापासून याठिकाणी आलेले आहेत. तेव्हापासून चार ठेकेदार आणि राजकीय पाठबळ मिळवत अनेक बोगस कामे करण्यात आली आहेत. न झालेल्या कामांची बिले देखील लाटली आहेत. याठिकाणी उपभियंता पद रिक्त ठेवून शाखा अभियंताच उपभियंता पद सांभाळत असून हे सर्व सोयीनुसार केलेले आहे का असा सवाल देखील धनंजय देशमुख यांनी केला आहे. अमृत पाटील यांची ईडी चौकशी झाल्यास त्यांच्याकडून किमान ५० कोटी रुपयांचा परतावा शासनाला द्यावा लागेल असा गंभीर आरोप धनंजय देशमुख यांनी केला आहे.**

। महाड । वार्ताहर ।

पोलादपूर या दुर्गम तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन २०१९ पासून आतापर्यंत झालेल्या कामात मोठा भ्रष्टाचार झाला असून या संपूर्ण कामांची न्यायालयीन चौकशी केली जावी आणि संबंधित अधिकाऱ्यांची ईडी चौकशी व्हावी अशी मागणी शिवेसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रवक्ते धनंजय देशमुख यांनी केली आहे. आज घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पोलादपूर सार्वजनिक बांधकाम विभागातील भ्रष्ट कारभाराबाबत पोलखोल केली आहे. या सर्वाना कोणाचे पाठबळ आहे हे सांगायला नको असे नाव न घेतादेखील त्यांनी सत्ताधारी पक्षावर आरोप केला आहे.

याबाबत धनंजय देशमुख यांनी एक पत्रकार परिषद घेवून पोलादपूर तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कशा प्रकारे कामे केली आहेत आणि पैसा खर्च झाला आहे याबाबत पोलखोल केली. सन २०२१ च्या महापुरामुळे पोलादपूर तालुक्यात झालेल्या रस्ते व शासकीय इमारती, शासकीय कार्यालयांच्या दुरुस्तीसाठी पूर हानी कार्यक्रमांतर्गत सुमारे सहा कोटी रुपयांची दुरुस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूर यांच्या मार्फत करण्यात आली. हि कामे बोगस व निकृष्ट दर्जाची तसेच अनेक ठिकाणी कामे न करता कागदोपत्री बिले अदा करण्यात आली आहेत. ज्या शाखा अभियंत्याने केले त्याची तसेच तत्कालीन उपविभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांची देखील खातेनिहाय चौकशी होणार असल्याने महाड सार्वजनिक बांधकाम विभागा मधील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. याबाबत सन २०१९ ते सन २०२४ या कालावधीत तालुक्यातील चार एजन्सीनाच कामे देण्यात आली आहेत. यामध्ये समर्थ एन्टरप्रायझेस, मधुकर जाधव, स्वप्नील जाधव, पल्लवी जाधव यांचा समावेश आहे. एकाच कामांची अनेकवेळा कामे दाखवून बिले काढण्यात आली आहेत. येथील मोडकळीस आलेल्या पोलीस वसाहतीमध्ये एकच कर्मचारी राहत असताना डागडुजीखाली करोडो रुपये खर्च केले आहेत. कापडे गावातील शासकीय भांडारगृहावर देखील वर्षातून तीन ते चार वेळा खर्च केला जातो. या भांडारगृहाचा वापर मात्र स्थानिक ग्रामस्थ करत आहेत. पूरहानीमधून देखील करोडो रुपये खर्च करण्यात आले असून या कामामध्ये देखील मोठा भ्रष्टाचार झाला आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूर यांच्या कार्यकक्षेत सन २०२१ च्या पूरहानी कार्यक्रमांतर्गत पोलादपूर तालुक्यात करण्यात आलेल्या कामांमध्ये झालेल्या कामांची आणि बोगस बिलांची यादीच सादर करणार असून यासर्व कामांची वरिष्ठ पातळीवर चौकशी झाली पाहिजे अशी मागणी करून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या पोलादपूर उपविभागीय अभियंता कार्यालयामार्फत झालेल्या कामांमध्ये अनियमितता आहे, असे धनंजय देशमुख म्हणाले.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमच्या सांगण्यावरून **श्री. अजित मधुसुदन कुंटे** मु. पो. बामणगांव, ता. अलिबाग यांचे खुद्द मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील असलेली मौजे-कावीर, ता.अलिबाग, जि. रायगड शेतजमिन मिळकतींबाबत शोध/तपास करीत आहोत. सदरची मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. अजित मधुसुदन कुंटे** यांच्याबरोबर आमचे आशिलांची खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याबाबतची बोलणी चालू आहे.

मौजे-कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील दुय्यम निबंधक, अलिबाग यांच्या कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत आहे. मिळकतीचे वर्णन खलीलप्रमाणे आहे.

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै. ) |
|---|---|---|---|
| कावीर, ता. अलिबाग | १७७ प्लॉट नं. १ | २२५.०० | २२-५० |

जर कोणालाही/कोणचाही सदरील मिळकतीचे संदर्भात विक्री, अदलाबदल, हस्तांतरण, असाईन मेंट, देणगी, हवाला, वारसा, लायसन्स, देखभाल, बीकवेस्ट, इजमेंट, कॉव्हेनंट, गहाण, दान, बक्षिस, लीन, लिस करार, भाडेपट्टा, ताबा, वहिवाट, जप्ती, लिस पेंडन्स, एफ.एस.आय. वा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार, मागणी, हितसंबंध, वा दावा, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर लेखी कळवावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजुन आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- अलिबाग. सही/-
दिनांक- १८/०४/२०२४.
**ॲड. प्रियांका किशोर बिर्जे**
मु.पो. कुरुळ, ता. अलिबाग
जि. रायगड, मो. ८३७९९३७८७०

### जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत विनायक प्रमोटर्स तर्फे अतुल महादेव भगत, राहणार १९१, महात्मा गांधी रोड, कॅम्प, पुणे ४११ ००१, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी. ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता. अलिबाग. | १६६/१९०/१९६/१९७ /१९८/१६० | ४-५०-०० एकूण | ४५-०० |

अलिबाग,
दिनांक : १६/०४/२०२४. सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मौजे- खालापुर, तालुका खालापुर, जिल्हा-रायगड** येथील **सौ. मीना बाळकृष्ण बाम** यांच्या मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या शेतजमीनी आमचे आशिलांनी त्यांचेकडून कायम खरेदीखतान्वये खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे- खालापुर, तालुका खालापुर, जिल्हा - रायगड**

| अ.क्र. जमीन मालकांचे नांव | गट/हिस्सा नं. | भूधारणा पध्दती | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) सौ. मीना बाळकृष्ण बाम | ४८/१ | भोगवटादार वर्ग-१ | ०-१६-४० | २=१२ |
| | | पोट खराबा | ०-०१-०० | |
| | | **एकूण क्षेत्र** | **०-१७-४०** | |
| २) सौ. मीना बाळकृष्ण बाम | ४८/३ | भोगवटादार वर्ग-१ | ०-१७-०० | २=१२ |
| | | पोट खराबा | ०-०१-०० | |
| | | **एकूण क्षेत्र** | **०-१८-००** | |

सदरहू मिळकतीत कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्तखत, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंन्डन्स नोटीस, मा.दिवाणी न्यायालयाचे जैसे-थे हुकूम अथवा मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर दिवाणी न्यायालयाने अंतिम न्याय-निर्णय अथवा हुकूमनामा पारित केलेला असल्यास, कोणत्याही महसूली न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यास अथवा महसूली न्यायालयाचे मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर अंतिम न्याय-निर्णय पारित केलेले असल्यास अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आंत योग्य त्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजाविरहित आहे आणि सदरहू मिळकतीतील विक्री करणार यांचे मालकी हक्क स्वच्छ व विक्री योग्य आहेत, असे गृहित धरुन, आमचे अशील सदरहू मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारांत घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी. **सही/-**

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०४/२०२४
**श्री. जगदीश एन. उरणकर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
ऑफिसः- १०१,आदीत्यप्रज्ञा को.ऑप, हौ. सो. गोखले हॉल शेजारी, पनवेल-४१०२०६,ता.पनवेल, जि.रायगड.

### जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे कि आम्ही (१) ड्रीम इस्टेटस अफोर्डेबल रिएलिटी एलएलपी (पूर्वी मेसर्स ड्रीम इस्टेटस म्हणून ज्ञात) (**"डीइएआरएलएलपी"**), (२) वॉकवॉटर प्रॉपर्टीएस प्रायव्हेट लिमिटेड (**"डब्ल्यूपीपीएल"**), (३) थ्रिल पार्क लिमिटेड (**"टीपीएल"**) आणि (४) इमॅजिकावर्ल्ड एंटरटेनमेंट लिमिटेड (पूर्वी ॲडलॅब्ज एंटरटेनमेंट लिमिटेड म्हणून ज्ञात) (**"आयइएल"**) यांच्या येथे खाली लिहिलेल्या परिशिष्टात अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या मालमत्तासंबंधी हक्क, हित आणि स्वारस्य चौकशी करत आहोत .

सर्व व्यक्ती / एंटिटीज ज्या किंवा वित्तीय संस्था यांचा समावेश आहे त्या खालील नमूद मालमत्ता किंवा त्याच्या कोणत्याही भागा संबंधी कोणत्याही भागामध्ये आणि/अथवा खालील व्यक्ती अथवा एंटिटीज साठी कोणताही भाग, हक्क, हित, दावा, लाभ, मागणी अथवा स्वारस्य आहे किंवा दावा आहे त्यांचा विक्री, देवाण घेवाण, परवानगी, भाडेपट्टी , उप भाडेपट्टी , परवाना, बेचनपत्र, गहाण (त्या इतकेच किंवा अन्यथा), वारसा, मृत्युपत्रानुसार मिळालेली मिळकत, वारसा हक्क, भेट, धारणाधिकार, ताबा, प्रतिपाळ, वहिवाटीचा हक्क, विश्वस्त संस्था, अधिकार, कौटुंबिक तजवीज/सेटलमेंट, हुकूमनामा किंवा कोणत्याही कोर्ट ऑफ लॉ चा आदेश, कंत्राटे/करारनामे, विकास हक्क, भागीदारी अथवा ज्या कोणत्याही स्वरुपाद्वारे, त्यांनी याद्वारे त्या विषयी कृपया लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांकडे खालील नमूद पत्ता/इ मेल आयडी येथे ह्या जाहीर सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **चौदा (१४) दिवसात** सूचित करणे आवश्यक आहे, अन्यथा, सदर दावा/मागणी किंवा दावे / मागण्या आणि/अथवा आक्षेप, जर कोणतेही असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत किंवा त्याग केले आहेत असे समजण्यात येईल. ह्या जाहीर सूचनेला प्रतिसाद म्हणून आलेले सर्व दावे/मागण्या आणि आक्षेप जे असतील त्यावर क्र. **G0410** असे नोंदवावे.

**परिशिष्ट**

जमिनीचे ते सर्व तुकडे आणि हिस्से ज्याचे क्षेत्रफळ एकूण ६८८.४० आर इतकेच म्हणजे १७ एकर्स आणि ८.४० गुंठे जे व्हिलेज गणेशनगर आणि खानाव, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे स्थित आहे आणि जुने व नवे गट क्रमांक खालील प्रमाणे आहेत :

| जुने व्हिलेज नाव | जुना गट क्र. | सध्याचे व्हिलेज नाव | सध्याचा गट क्र | ७/१२ उताऱ्यानुसार क्षेत्र आर मध्ये | सध्याच्या ७/१२ उताऱ्या नुसार मालकांचे नाव / हक्क दस्तऐवज |
|---|---|---|---|---|---|
| खानाव | ३२५ | गणेशनगर | १५० | १३४ | डीइएआरएलएलपी |
| खानाव | १७४ | गणेशनगर | १४ | ८६.५० | (१) डब्ल्यूपीपीएल ४४ आर साठी पात्र आहेत, आणि (२) डीइएआरएलएलपी ४२.५० आर साठी पात्र आहेत |
| खानाव | १७५ | गणेशनगर | १५ | ८७.५० | डीइएआरएलएलपी |
| खानाव | २१४ | गणेशनगर | ४१ | ९ | आयइएल |
| खानाव | २१५ | खानाव | १७४ | ३८ | डीइएआरएलएलपी |
| खानाव | २७६ | गणेशनगर | १०१ | १९९.६० | (१) टीपीएल ७७.३० आर साठी पात्र आहेत, आणि (२) डीइएआरएलएलपी १२२.३० आर साठी पात्र आहेत |
| खानाव | २७८ | गणेशनगर | १०३ | १.८० | डीइएआरएलएलपी |
| खानाव | १६८(भाग) | गणेशनगर | ८(भाग) | १३२ | डब्ल्यूपीपीएल |

दिनांकीत १८ एप्रिल, २०२४

**सागर कदम**
**भागीदार**
**डीएसके लीगल**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
१७०१, वन वर्ल्ड सेंटर, मजला १७, टॉवर २बी
८४१, सेनापती बापट मार्ग, एल्फिस्टन रोड, मुंबई – ४०० ०१३
इ मेल : srs.publicnotice@dsklegal.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन :-
मौजे-उक्रुळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| शुभम मोहनलाल प्रल्हादका | ४० | १ | ०-२८-८० | ३ | ९४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला,
गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-१८/०४/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे पोयनाड, ता. अलिबाग येथील गट नंबर १८७/८ एकूण क्षेत्र ०-८२-०० हे.आर आकार १७ रु.६३ पैसे ही भातशेती व वरकशी मिळकत श्री. मनोजकुमार विश्वनाथ पाटील यांचे नावे ७/१२ चे दप्तरी दाखल आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबाकब्जा श्री. मनोजकुमार विश्वनाथ पाटील रा. विद्यानगर वरसोली, ता. अलिबाग यांचा आहे असे त्यांनी दाखविलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबतचा शोध घेण्याकरिता आणि त्याप्रमाणे मालकीहक्काबाबतचा दाखला देणेकरिता त्याने मला सांगितले आहे.

तरी सदर मिळकतीच्या संदर्भात कोणाचीही, गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास मिळकतीची मालकी व ताबाकब्जा श्री. मनोजकुमार विश्वनाथ पाटील यांचाच आहे असा दाखला (TITIL CERTIFICATE )देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. १७/०४/२०२४ सही/-
**श्री. सचिन बी. जोशी**
(ॲडव्होकेट-कोर्ट अलिबाग)
कार्यालयीन पत्ता- दुसरा मजला,
साईलिला अपार्टमेंट श्रीबाग नं. २
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं. ९८२२६५३६५५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, श्री सुबोध सुभाष नाईक, यांनी त्यांचे मालकीच्या मौजे रांजणपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २८/२ क्षेत्र ०-३५-५० (हे. आर) आकार १.०५ (रू. पैसे), गट नं. २८/७ क्षेत्र ०-२३-५० (हे. आर) आकार ०.८३ (रू. पैसे) व गट नं. ३४/३/० क्षेत्र ०-६६-२० (हे.आर) आकार १५.४१ (रू. पैसे) अशा सर्व मिळकतींच्या संदर्भात निर्वेध मालकी हक्काच्या दाखल्याची मागणी केली आहे. तरी सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या मिळकतींत श्री. सुबोध सुभाष नाईक यांचे व्यतिरिक्त अन्य कोणचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, निर्वेध मालकी हक्काचा दाखला दिला जाईल याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
अलिबाग, तारीख:
तारीख : १८/०४/२०२४. **(ॲड. सुरेंद्र नारायण जोशी)**
अ-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग, जिल्हा रायगड.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

■ अलिबागमध्ये ब्लॉक व दुकानाचे गाळे भाड्याने देणे आहे. संपर्क : मोबाईल ९८२२०३१०१७/९०२८५६५९१७

■ गाळा भाड्याने देणे आहे. साबू हॉस्पिटल बिल्डींग पी.एन. पी.मध्ये गाळा नं.१६ कलावती भाजी भंडारच्या बाजूला contact No. 7304852315/9604138826

■ हॉस्पिटलमध्ये कामासाठी अनुभवी स्टाफची आवश्यकता आहे. नर्स (ANM/GNM) वॉर्डबॉय, मावशी) अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल. मो. ९३२१३०३९३८, ९११९५६५०२२, ७७४५०५००२५

■ अलिबाग येथे मोठा फ्लॅट (2BHK) विकणे आहे. किंमत रूपये ७४ लाख (Negotiable) ८२७५११९८८३

■ बाईक व लाईसन्स आवश्यक किमान १२ वी पास. १) अलिबागमध्ये मोबाईल सेल्स व डिल्हीवरी, २) पेणमध्ये मोबाईल सेल्स व डिल्हीवरी, ३) रोहा/माणगाव मोबाईल सेल्स व डिल्हीवरी पार्ट टाईम, फुल टाईम, पगार १०,००० पासून पुढे. मोबाईल – ८८८८२२०२२१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-सहाण, ता. अलिबाग, गट नं. १०९/२, क्षेत्र ०-५८-२० हे. आर. पो.ख. ०-०४-७० हे. आर. एकूण क्षेत्र ०-६२-९० हे. आर., आकार १३.९३ रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२५-०० हे.आर., आकार ४.८६ रु.पै., ही मिळकत, तसेच या मिळकतीत जाण्या येण्याकरीता मौजे सहाण, गट नं. ११६, या मिळकतीतून ४ मीटर रुंदीच्या रस्त्याचा हक्कांगासह (तद्नंतर सदर जाहीर नोटीशीत 'सदर मिळकत'असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक १) सौ. माया संदीप गोठीवरेकर २) श्री. संदीप कमळाकर गोठीवरेकर सर्व रा. मु. ११६४, त्रिमुर्ती प्लाझा, रुम नं. २०८, अलिबाग अर्बन बँकेसमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्याकडून सदरची मिळकत आमच्या अशीलांनी खरेदी करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १७/०४/२०२४ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सदर नोटीसीने संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाल्हे, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या सामाईक मिळकतीपैकी ०-२१-००हे.आर. आकार ०.३५ एवढ्या क्षेत्राचे विद्यमान मालक दिलीप महादेव रानडे रा. पाल्हे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमिन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर मिळकत ही सामाईक असून निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| पाल्हे, ता.अलिबाग जि. रायगड | ६२ | ०-७९-०० पैकी ०-२१-०० | १.३३ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, सही/-
दि. १७-०४-२०२४
**ॲड. हेझेंल लेवी भोनकर**
श्री गुरुदत्त को-ऑप.सोसायटी, डी विंग,
पहिला मजला, ब्राह्मणआळी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८२२४११११०

## PNP EDUCATION SOCIETY
### Required Teaching Staff

PNP Education Society is one of the leading Education society working since 2001. For our various English medium schools (affiliated to CBSE and State Board) located at Nagaon, Sambari(Kurdus), Veshvi, Vavoshi and Khalapur we require Principals and teachers.

**Subjects** - Mathematics, Science, English, Social Studies, Hindi, Marathi, Computer Science, Art & Craft, French, Drawing and Physical Education Teachers
**Qualification** - As per the norms.

**Pay scale - For the post of the Principals Rs. 50,000/- to 1,00,000/-**
**For the post of the teachers Rs. 15,000/- to 30,000/-**

**Note :** Pay scale depends on the qualification, experience, teaching skills and previous CTC. / Fluency in English is a must.

**For more details please contact**
Rajashree Patil : 9892150116 / Shruti Sutar : 9673371587
**Please mail your CV on**
shrutisutar154@gmail.com
pnp.rajashree@gmail.com / pnpedusoc@gmail.com
**Dates :** 18th April 2024
**Timing :** 11 a.m. to 3 p.m.
**Venue :** PNP Ganga Vishnu jakhotia memorial English medium School khalapur.. near by panchayat samiti. Tal -Khalapur, Dist- Raigad.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
**- मुख्य संपादक**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-म्हात्रोळी, ता. अलिबाग, येथील गट नंबर २२६/१/२, एकूण क्षेत्र २-३१-९०, आकार १६.४३ रू. पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र २-०७-६० हे. आर. आकार १४.४६ रु. पै. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. बाळाराम मोरेश्वर नाईक, २) श्री. सिताराम मोरेश्वर नाईक ३) श्री. सुधाकर मोरेश्वर नाईक सर्व रा. मु. म्हात्रोळी, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १७/०४/२०२४ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक रुबाबबाई अब्दुल तैयाब यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :- मौजे-मोठे वेणगाव, तालुका कर्जत,जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६७/१ | ०-३९-०० हे आर पॉ | ६-६९ |
| ६७/५ | ०-३२-०० हे आर पॉ यापैकी ०-२१-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ५-७५ |
| ६८/१ | ०-३८-०० हे आर पॉ | १-१२ |
| ६८/२ | ०-३३-०० हे आर पॉ | ०-४० |
| ६८/६ | ०-२१-०० हे आर पॉ | ०-२८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक -१६/०४/२०२४
**ॲड.निलेश कान्हु मोरे मोबा.९८२२६९११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा.९९२२१२४८५२**
**ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१**

## निवडक

### दिल्लीचे सर्वस्व पणाला

**नवी दिल्ली :** दिल्ली संघाने सहा सामन्यांमधून दोन सामन्यांत विजय, तर चार सामन्यांत पराभव पत्करला आहे. प्ले ऑफमध्ये पोहोचण्यासाठी उर्वरित आठ लढतींमध्ये त्यांना सर्वस्व पणाला लावावे लागणार आहे. रिषभ पंत (१९४ धावा), ट्रिस्टन स्टब्स (१८९ धावा) या दोन फलंदाजांनी दिल्लीसाठी छान खेळ केला आहे. डेव्हिड वॉर्नर (१६६ धावा) व पृथ्वी शॉ (१५१ धावा) यांनीही चमक दाखवली आहे; पण सातत्यपूर्ण खेळाची गरज त्यांना आहे.

### अव्वल खेळाडूंमध्ये प्रवेश

**नवी दिल्ली :** आयपीएलचा ३१व्या सामन्यात राजस्थानने कोलकाताला २ विकेट्सने पराभूत केले. या सामन्यात बटलरने ६० चेंडूत १०७ धावा केल्या, ज्यामध्ये ९ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश आहे. सुनील नारायणने ५६ चेंडूत १०९ धावा केल्या, ज्यामध्ये १३ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता. या सामन्यानंतर केकेआरचा अष्टपैलू सुनील नारायण आणि राजस्थानचा यष्टीरक्षक फलंदाज जॉस बटलर यांनी ऑरेंज कॅपच्या शर्यतीत पहिल्या १० खेळाडूंमध्ये प्रवेश केला आहे.

### विराट कोहली प्रथम

**नवी दिल्ली :** आयपीएलमध्ये आत्तापर्यंत सर्वात जास्त धावा करण्याच्या यादीत विराट कोहली पहिल्या क्रमांकावर आहे. विराटने आत्तापर्यंत ७ सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने ७२.२ च्या सरासरीने ३६१ धावा केल्या आहेत. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर राजस्थानचा रियान पराग आहे. रियानने आत्तापर्यंत खेळलेल्या ७ सामन्यांत ६३.६ च्या सरासरीने ३१८ धावा केल्या आहेत. तर, रोहित शर्मा यादीत ५ व्या स्थानावर आहे. रोहितने ६ सामन्यांत २६१ धावा केल्या आहेत.

### राजस्थानचे वर्चस्व

**कोलकाता :** आयपीएलच्या पॉईंट्स टेबलमध्ये पहिल्या क्रमांकावर राजस्थान रॉयल्स आहे. राजस्थानने आत्तापर्यंत ७ सामने खेळले आहेत, त्यापैकी संघाला फक्त एका सामन्यात अपयश आले आहे. राजस्थान संघाने ६ सामने जिंकले आहेत. तर, कोलकाता नाईट रायडर्स आपल्या ४ विजयांसह पॉईंट्स टेबलमध्ये दूसऱ्या क्रमांकावर आहे. कोलकाताने आत्तापर्यंत ६ सामने खेळले आहेत, त्यापैकी संघाला दोन सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे.

### खानच्या डोळ्यात पाणी

**कोलकाता :** बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता शाहरुख खानचा आयपीएल संघ कोलकाता आणि राजस्थान यांच्यात मंगळवारी सामना झाला. या सामन्यात राजस्थान ही टीम जिंकली. त्यामुळे केकेआर संघाचे चाहते नाराज झाले. शाहरुख त्याच्या संघाला सपोर्ट करण्यासाठी स्टेडियममध्ये आला होता. केकेआरच्या पराभवानंतर शाहरुख खानचे स्टेडियममधील अनेक व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यामधील एका फोटोत किंग खानच्या डोळ्यात अश्रू दिसले.

# पॅरिस ऑलिंपिकचे बिगुल वाजले

**। ऑलिंपिया । वृत्तसंस्था ।**

**यावर्षी २६ जुलै ते ११ ऑगस्ट यादरम्यान फ्रान्समधील पॅरिस येथे ऑलिंपिक या जागतिक क्रीडा महोत्सवाची धूम पाहायला मिळणार आहे. या प्रतिष्ठेच्या क्रीडा स्पर्धांचे बिगुल मंगळवारी वाजले. ग्रीसच्या दक्षिणेकडे पॅरिस ऑलिंपिकची ज्योत प्रज्वलित करण्यात आली.**




याप्रसंगी खराब हवामान असल्यामुळे पारंपरिक पद्धतीने ज्योत प्रज्वलित करण्यात अपयश आले. ग्रीक महिला पुजाऱ्यांच्या हस्ते सूर्यकिरणच्या साहाय्याने या ज्योतीचे प्रज्वलन करता आले नाही. सोमवारी ज्योत प्रज्वलित करण्याची रंगीत तालीम घेण्यात आली होती. तीच ज्योत मंगळवारी प्रज्वलित करण्यासाठी वापरण्यात आली. आता पाच हजार किलोमीटरचा प्रवास करून ही ज्योत अथेन्स येथे पॅरिस ऑलिंपिक आयोजकांच्या हातामध्ये सुपूर्द करण्यात येणार आहे. ११ दिवसांचा ज्योतीचा प्रवास २६ एप्रिल रोजी संपेल.

- **खराब हवामानामुळे पर्यायी ज्योत प्रज्वलित**
- **पाच हजार कि.मी.चा प्रवास सुरू**

आता ही ज्योत ऑलिंपिया येथील मंदिरापासून क्रीडा मैदानांपर्यंत एकूण पाच हजारपेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास करणार आहे. ग्रीसचा रोईंगपटू स्टेफानोस नोसकोस याने टोकियो ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक पटकावले होते. त्यामुळे त्याच्या हातामध्ये पहिल्यांदा ही ज्योत देण्यात आली.

> सध्या जगभरात युद्ध व संघर्ष सुरू आहे. नकारात्मक, क्रोध, आक्रमकता या बाबींमुळे सर्वसामान्य त्रस्त झाले आहेत. सर्वांना एकत्रित आणण्याच्या पर्यायाची वाट बघितली जात आहे. ऑलिंपिकमुळे एकजुटता निर्माण होऊ शकते.
>
> -थॉमस बाक, अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती

### १९३६पासून रिलेला सुरुवात

**ऑलिंपिकचा पहिला मोसम ग्रीसमध्ये १८९६ मध्ये पार पडला. तसेच, १९२८ मधील नेदरलँडस् येथे पार पडलेल्या ऑलिंपिकमध्ये ज्योत प्रज्वलित करण्याचा विचार सुरू झाला. त्यानंतर १९३६ मधील ऑलिंपिक जर्मनीतील बर्लिन येथे पार पडले. तिथपासून मशाल रिलेला सुरुवात झाली.**

# सहकलाकार ठरले शिल्पकार

**। कोलकाता । वृत्तसंस्था ।**

इडन गार्डनवर केकेआरच्या सुनिल नारायणनं शतकी खेळी केली. आयपीएलमधली ही त्याची पहिलीच शतकी खेळी होती. हा धडाकेबाज फलंदाज केकेआरसाठी कायम हाणामारीची कामे करत आला आहे. मात्र, हाणामारी करता करता तो कधी शेवटपर्यंत जिवंत राहिला म्हणजे शतक ठोकलंय असे झाले नव्हते. मात्र, राजस्थान विरूद्ध त्याने आपल्या नावासमोर एक शून्य शून्य आकडा लावलाच.




केकेआरने राजस्थानविरूद्ध २२३ धावा केल्या. त्यात सुनिल नारायणच्या १०९ धावांचे मोठे योगदान होते. त्यानंतर केकेआरकडून सर्वाधिक धावा या अंगक्रिश रघुवंशीनं केल्या होत्या. त्याने १८ चेंडूत ३० धावा ठोकल्या. तर रिंकू सिंगने ९ चेंडूत २० धावा ठोकत केकेआरला २२० चा टप्पा पार करून दिला.

राजस्थानच्या रन चेसमध्ये देखील अशाच शतकवीर बटलर सोडून दोन खेळाडूंनी छोटे मात्र अत्यंत महत्वाचे योगदान दिले. हे योगदान केकेआरच्या रघुवंशी अन् रिंकू सिंगपेक्षा सरस ठरले म्हणून आरआरनं २२३ धावा पार केल्या. यावेळी सगळा फोकस हा रियान परागवरच होता. या पठ्ठ्याने ४२ च्या स्ट्राईक रेटने १४ चेंडूत ३४ धावा कुटल्या. यामुळे राजस्थान ८ व्या षटकापर्यंतच शतकाच्या जवळ आला होता. राजस्थानची मधली फळी ढेर झाली त्यावेळी बटलरने आपल्या अडखळत्या सुरूवातीचे रूपांतर अर्धशतकी खेळीत केले होते.

राजस्थानला शेवटच्या सहा षटकात विजयासाठी ९६ धावांची गरज होती. पॉवेलच्या छोट्या मात्र धडाकेबाज खेळीनंतर बटलरने प्रत्येक षटकात जवळपास १७-१८ धावा वसूल केल्या. त्याने सामना जिंकून देण्याची सुरूवात ही १७ व्या षटकापासूनच केली होती. त्यामुळे शेवटच्या षटकात राजस्थानने सामन्यावर मजबूत पकड निर्माण केली होती. ही पकड इतकी मजबूत होती. की बटलरला तीन चार बॉलवर एकही धाव न घेणे देखील परवडले. अखेर शेवटच्या चेंडूवर चौकार मारत बटलरनं राजस्थानला २२३ धावा चेस करून दिल्या.

# हार्दिक पांड्यावर टांगती तलवार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



सध्या भारतात आयपीएलचा थरार रंगला आहे, परंतु सर्वांचे लक्ष जूनमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकावर आहे. दरम्यान, मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याच्या अडचणी वाढलेल्या दिसत आहेत. या आयपीएल हंगामात तो फारसा फॉर्ममध्ये दिसत नाही. ना तो फलंदाजीत चमत्कार करत आहे ना गोलंदाजीत.

आयपीएल सुरू होण्यापूर्वी बीसीसीआयने सांगितले होते की, रोहित शर्मा कर्णधार असणार आहे आणि हार्दिक पांड्या उपकर्णधार असेल. पण हार्दिकची आयपीएलमधील कामगिरी पाहता उपकर्णधारपद सोडले तर त्याला संघात स्थान मिळणेही कठीण झाले आहे. शिवम जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे. गरज पडल्यास तो गोलंदाजीनेही संघाला साथ देऊ शकतो. अशा परिस्थितीत शिवमने या शर्यतीत हार्दिक पांड्याला मागे टाकल्याचे मानले जात आहे. पांड्याने उर्वरित सामन्यांमध्ये चांगली गोलंदाजी केल्यास त्याचा संघात समावेश केला जाऊ शकतो, अन्यथा त्याच्या जागी शिवम दुबेला खेळवले जाऊ शकते.

### फुटबॉलपटूचे निधन

**फ्रँकफर्ट :** विश्वचषक फुटबॉल स्पर्धा १९७४ मध्ये पश्चिम जर्मनीच्या विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावणारे बर्नड होल्झेनबाइन यांचे मंगळवारी निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. होल्झेनबाइन यांचा माजी क्लब आइनट्रॅक फ्रँकफर्टने त्यांच्या निधनाची बातमी दिली. आजपर्यंतचा आमच्या क्लबचा सर्वात महान खेळाडू हरपला, अशा शब्दांत फ्रँकफर्ट क्लबने होल्झेनबाइन यांनी आदरांजली वाहिली. होल्झेनबाइन पश्चिम जर्मनीसाठी ४० सामने खेळले. १९७४ मधील विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीतील त्यांची कामगिरी कायम लक्षात राहते. आपल्या क्लब कारकीर्दीत बहुतांश काळ फ्रँकफर्टकडून खेळले. निवृत्तीनंतर त्यांनी फ्रँकफर्टचे उपाध्यक्षपद भूषवले.

# इंग्लंड, श्रीलंकेकडून भारत पराभूत

**। कोलंबो । क्रीडा प्रतिनिधी ।**

जागतिक इनडोअर क्रिकेट महासंघाच्या मान्यतेने सिलोन इनडोअर क्रिकेट असोशिएशच्या पुढाकाराने इंग्लंड-एशिया कप इनडोअर क्रिकेट स्पर्धेत रंगत भरली जात आहे. यावेळी भारतीय संघाला इंग्लंडकडून पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे.

इंग्लंड विरुध्दच्या सामन्यात भारताचे खेळाडू प्रचंड दबावाखाली खेळताना दिसले. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना १६ षटकात ७५ धावा केल्या. तर, प्रती उत्तरादाखल इंग्लंडने जोरदार हल्ला करत ११२ धावा करून भारताला मोठ्या पराभवाला सामोरे जायला भाग पाडले. या सामन्यात भारताच्या विजय गौडाने १९ धावा तर दैविक रायने १८ धावा व १ बळी घेत भारताला सन्मानजनक धावसंख्या मिळवून दिली होती. तर इंग्लंडच्या नव पटेल (२३ धावा), टॉम क्लार्क ( १६ धावा १ बळी), ऑलीव ग्रीन (१५ धावा २ बळी) यांनी मोठा विजय मिळवून दिला.

दुसऱ्या साखळी सामन्यातसुध्दा भारताला पराभव पत्करावा लागला. या सामन्यात भारताने श्रीलंकेला १०३ धावात रोखले. तर, भारताने अतिशय अतितटीच्या खेळात ९२ धावा करत जोरदार लढत दिली. या सामन्यात धनुष भास्करला (१६ धावा २ बळी) सामनावीर पुरस्कार देऊन गौरविले. विजय गौडा (१६ धावा १ बळी) व अफरोज पाशा (२० धावा) यांनी जोरदार खेळी केली. तर, श्रीलंकेच्या दिलसारा सासंका (१६ धावा १ गुण), चंडीमा आबेयून (१७ धावा १ बळी), विनुदा लियानगे व शेवोन फोनसेका (प्रत्येकी १८ धावा व १ बळी) यांनी श्रीलंकेला विजय मिळवून दिला.

यावेळी भारत (२०.५ गुण) गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर फेकला गेला आहे. तर, श्रीलंका (३५.५ गुण) व इंग्लंड (२१ गुण) अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या स्थानावर आहेत. इतर सर्व संघाचे साखळी सामने झाले असल्याने त्यांना गुण वाढवण्याची कोणतीही संधी नाही. पहिले दोन संघ अंतिम सामना खेळातील. त्यामुळे या स्पर्धेत भारताला अजून एक सामना सिंगापूर विरुध्द खेळायचा असल्याने भारत अंतिम सामन्यात खेळताना दिसेल.

# बीसीसीआयकडून अय्यरवर कारवाई

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल स्पर्धेतीधल ३१ वा सामना कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स संघात झाला. मंगळवारी (दि.१७) कोलकाताच्या घरच्या मैदानावर म्हणजेच ईडन गार्डन्सवर झालेल्या या सामन्यात राजस्थान रॉयल्सने २ विकेट्सने रोमांचक विजय मिळवला.




दरम्यान, कोलकाताला या सामन्यातील शेवटच्या चेंडूवर पराभवाचा धक्का तर बसलाच, पण आता कर्णधार श्रेयस अय्यरवरही मोठी कारवाई करण्यात आली आहे. या सामन्यात कोलकाता संघाकडून निर्धारित वेळेत षटके पूर्ण करण्यात न आल्याने बीसीसीआयकडून श्रेयस अय्यरला १२ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

आयपीएलच्या प्रसिद्धी पत्रकात माहिती देण्यात आली आहे की, आयपीएलच्या आचार संहितेतील षटकांच्या गतीबाबतच्या नियमाचा भंग करण्याची ही कोलकाता नाईट रायडर्स संघाची पहिलीच वेळ आहे. त्याचमुळे यावेळी कर्णधार श्रेयस अय्यरवर १२ लाखांचा दंड ठोठावण्याच आला आहे.

# ठाणे ज्युनियर लीग क्रिकेट स्पर्धा

**। ठाणे । वृत्तसंस्था ।**

संदीप दहाड अकॅडेमी आयोजित १२ वर्षे वयोगटाच्या १५ षटकांच्या ठाणे ज्युनियर लीग क्रिकेट स्पर्धेत स्पोर्टिंग क्लब कमिटी संघाने विरारच्या अमेय स्पोर्ट्स अकॅडेमीचा तब्बल आठ गडी राखून दणदणीत पराभव केला. त्यांनी सलग दुसऱ्यांदा विजेतेपद मिळवल आहे. या निर्णायक लढतीत क्लब कमिटीने ११२ धावांचे आवाहन १३.५ षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले आणि जेतेपद कायम राखले.



सेंट्रल मैदानावर झालेल्या अंतिम लढतीत अमेय स्पोर्ट्स अकॅडेमीने प्रथम फलंदाजी करताना १५ षटकांत सात गड्यांच्या मोबदल्यात ११२ धावा केल्या होत्या. सोहम पलईने ४२ धावांची खेळी करत संघाच्या शतकी धावसंख्येत मोलाचे योगदान दिले. कौशिक साळुंखेने दोन, अतुल चौधरी आणि अर्णव पांडेने प्रत्येकी एक गडी बाद केला. स्पर्धेत सातत्यपूर्ण फलंदाजी करणाऱ्या अनुज चौधरीने या सामन्यातही आपली छाप पाडताना नाबाद ६८ धावा करत संघाला लागोपाठ दुसऱ्या वर्षी विजयी करण्यात मोलाची कामगिरी बजावली. कर्णधार आरुष खंदारेने २० धावा बनवल्या.

### गंभीरचे अजब वक्तव्य

**नवी दिल्ली :** आयपीएलच्या ३१ व्या सामन्यात राजस्थान रॉसल्स आणि कोलकाता नाइट रायडर्स यांच्यातील सामन्यात ४४७ धावा झाल्या. कोलकाताने २२३ तर राजस्थानने २२४ धावा केल्या. सुनिल नारायण आणि जॉस बटलर यांनी शतके ठोकली. केकेआरने २२३ धावा करून देखील सामना गमावला. सामना गमावल्यानंतर केकेआरचा मेंटॉर गौतम गंभीरने यंदाच्या हंगामात जो काही धावांचा महापूर आला आहे तो रोखण्यासाठी एक उपाय सुचवला. यामुळे सामन्यात बॅट अन् बॉलचं संतुलन निर्माण होण्यास मदत होईल. गौतम गंभीरनं चेंडू तयार करणारी कंपनी बदलण्याचा सल्ला दिला.

# गिल अन् यशस्वीचा पत्ता कट?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल नंतर लगेचच टी-२० विश्वचषक खेळला जाणार आहे. त्यासाठी संघ मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करायचा आहे. त्यामुळे बीसीसीआयमध्ये बैठका सुरू झाल्या आहेत. यंदाच्या विश्वचषकसाठी भारतीय संघात कोण-कोणत्या खेळाडूंचा समावेश होणार, हा प्रश्न आहे. दरम्यान, आयपीएल खेळणाऱ्या शुभमन गिल आणि यशस्वी जैस्वाल या दोघांपैकी एकाला वगळले जाऊ शकते, अशी बातमी आहे.



इशान किशन किंवा शुभमन गिल रोहित शर्मासोबत ओपनिंग करताना दिसतील, अशी अटकळ बांधली जात होती, पण आता जे नाव समोर आले आहे ते आश्चर्यचकित करणारे आहे. विराट कोहली रोहितसोबत ओपनिंग करताना दिसू शकतो, असा दावा केला जात आहे. अहवालात असा दावा केला जात होता की, भारतीय संघ निवडकर्ता विराट कोहलीला सलामीवीर म्हणून खेळवण्याचाही विचार करत आहे. यामुळे ईशान किशन, शुभमन गिल आणि इतर अनेक खेळाडूंना मोठा झटका बसला आहे, जे ओपनिंगचा दावा करत होते.

# भारताच्या नंबर वन बॅडमिंटनपटूची बाजी

- **पटकावली १७८ वी रँक**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताची बॅडमिंटनपटू कुहू गर्ग हिने फक्त बॅडमिंटन कोर्टमध्येच नाही, तर केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतही बाजी मारली आहे. मंगळवारी युपीएससी परिक्षेचा निकाल जाहीर झाला. परिक्षेत हजारांहून अधिक उमेदवारांना यश मिळाले असून यात कुहू गर्गचाही समावेश आहे.




### बॅडमिंटनमध्येही मिळवले मोठे यश

**कुहूने तिच्या बॅडमिंटन कारकिर्दीत ५६ ऑल इंडिया मेडल्स मिळवले आहेत, तिने १८ आंतरराष्ट्रीय मेडल्सही तिने जिंकले आहेत आहे. तिची आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनमध्ये मिश्र दुहेरीत सर्वोच्च जागतिक क्रमवारी ३४ आहे, तर देशात अव्वल क्रमांक ही तिची सर्वोत्त क्रमवारी राहिली आहे.**

खेळाबरोबरच आभ्यासही सांभाळत कुहूने युपीएससी परिक्षेत १७८ वा रँक मिळवला आहे. तिला तिच्या कारकिर्दीत तिच्या कुटुंबाकडून मोठी मदत झाली आहे. कुहूने सांगितले की, तिच्या यशाचे श्रेय तिचे वडील माजी आयपीएस अधिकारी अशोक कुमार यांना दिले आहे.

# गुकेश, नेपोनियात्ची पहिल्या स्थानावर कायम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**जागतिक विजेता डिंग लिरेन याच्यासमोर यंदाच्या विश्व अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत कोणत्या खेळाडूचे आव्हान असेल, याचे उत्तर आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेतील दहाव्या फेरीनंतरही मिळालेले नाही. डी. गुकेश व इयान नेपोनियात्ची या दोन खेळाडूंमधील दहाव्या फेरीमधील लढत ड्रॉ राहिली. त्यामुळे दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी अर्धा गुण मिळाला.**

आता गुकेश व नेपोनियात्ची हे दोन्ही खेळाडू सहा गुणांसह संयुक्तपणे अव्वल स्थानावर विराजमान आहेत. १४ फेरीनंतर या स्पर्धेचा विजेता ठरणार आहे. या स्पर्धेत विजेता ठरलेल्या खेळाडूला आगामी काळात होणार असलेल्या जगज्जेतेपदाच्या लढतीत डिंग लिरेनशी दोन हात करावे लागणार आहेत. डी. गुकेश व इयान नेपोनियात्ची यांच्यामधील लढतीत दोन्ही खेळाडूंकडून कोणताही वेगळा प्रयत्न बघायला मिळाला नाही. नेपोनियात्ची याला या स्पर्धेत आतापर्यंत एकाही लढतीत पराभवाचा सामना करावा लागलेला नाही.




आर. प्रज्ञानंद व विदित गुजराथी या दोन भारतीयांमध्ये सोमवारी लढत रंगली. प्रज्ञानंदला या स्पर्धेत फक्त गुकेशविरुद्धच्या लढतीत हार पत्करावी लागली आहे. इतर लढतींमध्ये त्याने छान खेळ केला आहे. ३९ चालींनंतर प्रज्ञानंद व गुजराथी यांच्यामधील लढत ड्रॉ राहिली.

### अमेरिकन बुद्धिबळपटूंचा विजय

**अमेरिकेच्या दोन बुद्धिबळपटूंनी दहाव्या फेरीत विजय साकारला. हिकारू नाकामुरा याने निजात एबासोव याला नमवले. तसेच, फॅबियानो कॅरुअना याने फिरॉझा एलिरेझा याच्यावर मात केली. गुकेश व नेपोनियात्ची यांनी प्रत्येकी सहा गुणांची कमाई केली आहे.**

### विजेतेपदाची संधी

**त्यानंतर आर. प्रज्ञानंद, हिकारु नाकामुरा व फॅबियानो कॅरुअना यांनी प्रत्येकी ५.५ गुणांची कमाई केली आहे. विदित गुजराथी याने पाच गुण कमावले आहेत. गुकेश, नेपोनियात्ची यांच्यासह प्रज्ञानंद, नाकामुरा, कॅरुअना व गुजराथी यांना विजेतेपदाची संधी असणार आहे.**

### चीनच्या महिला खेळाडूंमध्ये चुरस

**महिला विभागात चीनच्या खेळाडूंमध्ये कमालीची चुरस दिसून येत आहे. लेई टिंगजी व टॅन जोंगयी या चीनच्या बुद्धिबळपटूंनी प्रत्येकी ६.५ गुणांची कमाई करीत संयुक्तपणे पहिले स्थान मिळवले आहे. हा निकाल दहाव्या फेरीनंतरचा आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)